## लेखापरिक्षण अहवाल पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड सन २०११-१२

जा.क्र.स्था-३/ब/पशूनां/लेपअ/२०११-१२/ 2548
कार्यालय,
सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरिक्षा, नांदेड
दिनांक 8/12/2012

प्रेषक,
सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा, नांदेड

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

महोदय,

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेड सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण श्री.व्हि.बी.मुंडे, वलेप, एस.एल.बडवणे कलेप व पी.आडेकर कलेप स्थानिक निधी लेखापरिक्षा नांदेड यांनी दिनांक २७.०८.२०१२ ते १५.०९.२०१२ च्या दरम्यान पुर्ण केले. श्री. वाय एच. गच्चे, लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरीक्षा नांदेड यांनी दि.२९.११.२०१२ रोजी अहवालाचे पुर्नविलोकन केले.

श्री.पी.व्हि.डाके सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नांदेड यांनी दिनांक ३/१२/२०१२ रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्याशी चर्चा करून अहवालाचे अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी जिल्हा परिषद नांदेड येथे कार्यरत होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष : | श्री. माणिकराव इंगोले | ०१.०४.२०११ ते ३१.०३.२०१२ |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी : | १.श्री.श्रावण हर्डीकर | ०१.०४.२०११ ते ०३.०६.२०११ |
| | | २.श्री.दिपेंद्रसिंह कुशवाह | ०४.०६.२०११ ते ३१.०३.२०१२ |
| ३. | जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी : | १.श्री.ल.सि.पवार | ०१.०४.२०११ ते ३१.०३.२०१२ |

(१)

## मागील लेखा परिक्षण अहवाल : प्रलंबित परिच्छेद

मागील लेखा परिक्षण अहवालातील खालील आक्षेप थकीत असुन त्या बाबत मा. आयुक्त औरंगाबाद विभाग यांचे कडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.

२.१) लेखा परिक्षण अहवाल सन १९६८-६९
परि.क्रं.२०३

२.२) लेखा परिक्षण अहवाल सन १९७०-७१
परि.क्रं.२२०

२.३) लेखा परिक्षण अहवाल सन १९७४-७५
परि.क्रं.१०७

२.४) लेखा परिक्षण अहवाल सन १९७५-७६
परि.क्रं.७२

२.५) लेखा परिक्षण अहवाल सन १९७६-७७
परि.क्रं.२५

२.६) लेखा परिक्षण अहवाल सन १९७८-७९
परि.क्रं. १५

२.७) लेखा परिक्षण अहवाल सन १९८०-८१
परि.क्रं. १०,११ ब १२,१३

२.८) लेखा परिक्षण अहवाल सन १९८१-८२
परि.क्रं.९,१०,११,१२,१३,१८,२०

२.९) लेखा परिक्षण अहवाल सन १९८२-८३
परि. क्र. ११,१७,२१,२४,२५,२६

२.१०) लेखा परिक्षण अहवाल सन १९८३-८४
परि.क्रं.१३,१४,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.२० कागद पत्रे उपलब्ध न केले बाबत.(५.२८५) (अ,५२)
परि.क्रं.२१ प्रमाणके उपलब्ध न केले बाबत.(५.२८५) (ब.१०)

२.११) लेखा परिक्षण अहवाल सन १९८४-८५
परि.क्रं.४,८,१४,१८,१९,१६
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.१९ प्रमाणके उपलब्ध न केले बाबत (५.३०५) (ब ८)

२.१२) लेखा परिक्षण अहवाल सन १९८५-८६
परि.क्रं.४,८,१०,११,१२,१४,१५,१८ ब

२.१३) लेखा परिक्षण अहवाल सन १९८६-८७-८८
परि.क्रं.४,५,६,७,८,१०,१६,१८,१९,२०,२१,२५,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५, ३७,३८,४०, ४१,४२,४३,४४,४५
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं. ४४ आगाउ रकमा (५.४१४)

२.१४) लेखा परिक्षण अहवाल सन १९८८-८९
परि.क्रं. ४,८,९,१०,११,१२,१३,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२५,२६,२९, ३२,३६,३७,३९,४०,४१

२.१५) लेखा परिक्षण अहवाल सन १९८९-९०
परि.क्रं.४,५,६,८,९,१०,११,१२,१३,१५,१७,१८,२०,२२, २३, २५,२६, २७,२९,३०,३१,३२,३३

२.१६) लेखा परिक्षण अहवाल सन १९९०-९१

परि.क्रं.३,८,१०,११,१३,१४,१५,१६,१७,२१,२२,२३,२६,२८,२९,

२.१७) लेखा परिक्षण अहवाल सन १९९१-९२
परि.क्रं.४,११,१२,१३,१४,१५,१६,१७,२०,२१,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३२,३३,३६

२.१८) लेखा परिक्षण अहवाल सन १९९२-९३
परि.क्रं.४,८,१०,११,१४,१५,१६,१८,१९,२०,२२,२४,२६,

२.१९) लेखा परिक्षण अहवाल सन १९९३-९४
परि.क्रं.४,५,६,८,१०,११,१२,१३,१४,१८

२.२०) लेखा परिक्षण अहवाल सन १९९४-९५
परि.क्रं. ४,५,७,८,९,१०,११,१४,१९,२०,२२,२४

२.२१) लेखा परिक्षण अहवाल सन १९९५-९६
परि.क्रं.३,६,८,९,१०,१७

२.२२) लेखा परिक्षण अहवाल सन १९९६-९७
परि.क्रं.३,४,८,९,११,१५,१९

२.२३) लेखा परिक्षण अहवाल सन १९९७-९८
परि.क्रं.४,५,६,(ब) ८,९,१०,११,१२,१३,१५

२.२४) लेखा परिक्षण अहवाल सन १९९८-९९
परि.क्रं.३,४,६,८,१६

२.२५) लेखा परिक्षण अहवाल सन १९९९-२०००
परि.क्रं.३,४,५,८,९,१२,१३,१७,१८,१९,२०,२१,२२,२५,२६,२७,२८,२९
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.३-अंदाज पत्रकीय तरतुद पेक्षा कमी ज्यादा खर्चा बाबत.(३.३३६) (५८)
परि.क्रं.८,५ औषध खरेदी बाबत (३.२४९)

२.२६) लेखा परिक्षण अहवाल सन २०००-०१
परि.क्रं.३,४,५,६,७,८,९,११,१३,१५,१६,१७,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.३ अंदाजपत्रकीय तरतुद पेक्षा कमी ज्यादा खर्चा बाबत.(३.५७०)(१००)

२.२७) लेखा परिक्षण अहवाल सन २००१-०२
परि.क्रं.३,५,८,९,१०,१२,१३,१४,१५,१७,१८,२३,२४,२५,२६,२९,३१
परास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.२४ लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न केले बाबत. (३.५२४)

२.२८) लेखा परिक्षण अहवाल सन २००२-०३
परि.क्रं.३,७,१०,११,१७,२५,२६

२.२९) लेखा परिक्षण अहवाल सन २००३-०४
परि.क्रं.३,४,५,६,७,८,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,
२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७
पंरास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.४१ लेखा परिक्षणसाठी अभिलेखे सादर न केले बाबत. (३.५६२) (५२)

२.३०) लेखा परिक्षण अहवाल सन २००४-०५
परि.क्रं.३,४,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,
३२,३४,३५,३८,४१,४२
पंरास लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद
परि.क्रं.१० :- पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी अतिरिक्त तरतुदी न खर्च करणे बाबत (३.४४२)
परि.क्रं.११ :-पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी फर्निचर खरेदि ११ व्या वि.आयो.च्या निधीतुन करणे बाबत. (३.४४३)
परि.क्रं.१५ :- पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी संयत्रे व हत्यारे पुरवठा करणे बाबत.(३.४४४)

२.३१) लेखा परिक्षण अहवाल सन २००५-०६

परि.क्रं.३,४,६,७,८,९,११,१२,१८,१९,२१,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३३,३५,३६,३७,
३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८

पंरास लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद

परि.क्रं.७ विशेष घटक योजनेतील दुधाळ जनावरांचा ५०% अनुदानावरील खर्चा बाबत. (३.१०२४)

परि.क्रं.८ विशेष घटक योजनेतील शेळी गट ५०% अनुदानावरील खर्चा बाबत. (३.१०२५)

परि.क्रं.९ विशेष घटक योजनेतील शेळी गट ५०% अनुदानावरील खर्चा बाबत. (३.१०२६)

परि.क्रं.११ गम बुट खरेदी बाबत.(३.१०२७)

२.३२) लेखा परिक्षण अहवाल सन २००६-०७

परि.क्रं.३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,
२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३६,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४६,४७,४८,४९,
५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७

पंरास लेखापरिक्षण पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद

परि.क्रं.८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,४२,५१ वैयक्तिक लाभाच्या योजना
खर्चातील अनियमितता बाबत.(३.१०५६)

परि.क्रं.२०,२१,२२,२३,२५,२६,३१,४४,४७,४८,४९ औषधी खरेदीतील अनियमितताबाबत. (३.१०५७)

२.३३) लेखा परिक्षण अहवाल सन २००७-०८

परि.क्रं.३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२४,२५,
२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,४०,४१,४२,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,४३

पंरास लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट परिच्छेद

परि.क्रं.२५ शेळी गट पुरविणे योजनेतील अनियमितता (३.६७१)

परि.क्रं.२६ वि.घ.यो.दुधाळ जनावरांचा पुरवठा योजनेतील अनियमितता (३.६७२)

२.३४) लेखा परिक्षण अहवाल सन २००८-०९

परि.क्रं. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,
२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३२,

२.३५) लेखा परिक्षण अहवाल सन २००९-२०१०

परि.क्रं.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,
२६,२७,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८.

२.३६) लेखापरीक्षण अहवाल सन २०१०-२०११

परि.क्र.१ :- अर्थसंकल्पीय तरतुद व कमी-जास्त खर्चाबाबत.

परि.क्र.२ :- बिगर आदिवासी योजना अंतर्गत पशुवैद्यकिय संस्थांना औषधी पुरवठा करणे बाबत.

परि.क्र.३ :- शेतक-यांच्या शेतावर टंचाई कालावधीत वैरण उत्पादनासाठी १००% अनुदानावर वैरण बियाणे व खते वाटप.

परि.क्र.४ :- अॅटो क्लोव्हे सिरींज खरेदिबाबत.

परि.क्र.५ :- संगणक अहर्ता परिक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी दिल्यामुळे झालेल्या जादा प्रमाणबाबत.

परि.क्र.६ :- विविध योजनेंतर्गत शितपेटया खरेदितील अनियमितता.

परि.क्र.७ :- सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती केलेनंतर आगावु वेतनवाढ मंजूर करणे बाबत.

परि.क्र.८ :- पशुवैद्यकिय दवाखाण्यासाठी सामुग्री व पुरवठा अंतर्गत औषधी खरेदिबाबत.

परि.क्र.९ :- विषेश घटक योजना अंतर्गत ५०% अनुदानावर शेळी गट पुरवठा करणे प्रदानातील अनियमितता बाबत.

परि.क्र.१० :- वेतन व भत्ते देयकातील अनियमितताबाबत.

परि.क्र.११ :- वि. घ. यो. अंतर्गत शेळी गट वाटपाबाबत.

परि.क्र.१२ :- विषेश घटक योजना अंतर्गत शेळी गट खरेदिबाबत.

परि.क्र.१३ :- वि.घ.यो. अंतर्गत शेळी गट वाटपाबाबत.

परि.क्र.१४ :- वि.घ.यो. अंतर्गत दुधाळ जनावरे गट वाटपाबाबत.

परि.क्र.१५ :- वाहन दुरुस्ती खर्चातील अनियमितताबाबत.
परि.क्र.१६ :- विविध योजने अंतर्गत केलेल्या औषधी व यंत्रसामुग्री खरेदितील अनियमितताबाबत.
परि.क्र.१७ :- वेतन व भत्ते देयकातील अनियमितताबाबत.
परि.क्र.१८ :- विशेष घटक योजनांतर्गत ५०% अनुदानावर शेळी गट पुरवठा करणे प्रदानातील अनियमितताबाबत.
परि.क्र.१९ :- मागासवर्गीयांना ५०% अनुदानावर शेळी गट पुरवठा करणे प्रदानातील अनियमितताबाबत.
परि.क्र.२० :- दुधाळ जनावरे खरेदिची किंमत रोखीने अदाई केल्याबाबत.
परि.क्र.२१ :- वेतन व भत्ते देयकातील अनियमितताबाबत.
परि.क्र.२२ :- पशुधन विकास अधिकारी कार्यालयाच्या किरकोळ रोखपुस्तिकेबाबत.
परि.क्र.२३ :- पशुधन विकास अधिकारी कार्यालयाच्या किरकोळ रोखपुस्तिकेबाबत.

उपरोक्त नमुद आक्षेपांचे संदर्भात त्या-त्या वर्षाचे पुढिल अभिप्रायामध्ये नमुद केलेले परिछेद क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

**परि. क्र. (१) अर्थसंकल्पीय तरतुद व कमी/जास्त खर्चाबाबत.**

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड द्वारा सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील प्राप्त तरतुद कमी/जादा खर्च यावर पुढिलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येतात.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३६ नुसार अंदाजपत्रकिय तरतुदिपेक्षा कमी/जादा खर्चास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेतली नाही.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ५८ (२)(४) व ५९ नुसार विहीत कार्यप्रणाली प्रमाणे वित्त विभागातील खर्चाशी ताळमेळ घेतलेला नाही.
३. शासन लेखाशिर्षामध्ये रु. १,०७,१४,६५९ जास्त खर्च केला आहे. रु. १,०७,१४,६५९ अनुदान प्राप्त करणे आवश्यक आहे.
४. शासन लेखाशिर्षामध्ये रु. १,२८,२२,६५७ कमी खर्च केलेला आहे. सदरची रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड**
**सन २०११-१२ मध्ये प्राप्त तरतुदी व झालेल्या खर्चाची माहिती**

| खर्चाचे शिर्षक | प्राप्त अंतिम तरतुद | मार्च २०११ अखेर खर्च | कमी/जास्त खर्च |
|---|---|---|---|
| २४०३०१९६ | ८,२४,२१,००० | ७,७१,१४,०९१ | -५३,०६,९०९ |
| २४०३-२६५३ | १०,२५,००० | ९,९३,३१७ | -३१,६८३ |
| २४०३२६९१ | ५१,३८,००० | ५६,६६,१८९ | +५,२८,१८९ |
| २४०३-२७०६ | ५,७३,००० | ५,४७,५१४ | -२५,४८६ |
| २४०३२२४१ | ६०,००,००० | ११,२४,७७२ | +४८,७५,२२८ |
| २४०३-२२४१ | १६,६२,००० | २,२३,५०० | +१४,३८,५०० |

**योजनांतर्गत योजना सन २०१०-११ प्राप्त तरतुदी व झालेला खर्च दर्शविणारे विवरण पत्र**

| अ. क्र. | | योजनेचे नाव | प्राप्त अंतीम तरतुद | मार्च २०१२ अखेर खर्च | कमी/जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| I | सामान्य योजना DPDC | | | | |
| | १ | पशुवैद्यकिय संस्थांना औषधी पुरवठा करणे (२४०३६८८२) | ५०,००,००० | ४०,२३,२२१ | -९,७६,७७६ |
| | २ | प्रदर्शन व प्रचार (२४५१२५०३) | १५,००,००० | ३८,४२५ | -१४,६१,५७५ |
| II | आदिवासी क्षेत्र उपयोजना | | | | |
| | १ | शेतक-यांच्या क्षेत्रावर वैरण विकासासाठी प्रयोजन (२४०३१६०१) | १,६८,००० | १,४८,००० | -२०,००० |
| | २ | दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा (२४०३१०८५) | - | १९,९३,२८३ | +१९,९३,२८३ |
| | ३ | पशुवैघकिय केंद्राचे बांधकाम (२४०३-६८७३) | ५०,००,००० | ११,९१,५४७ | -३८,०८,४५३ |
| | ४ | पवैद इमारत बांधणे (२४०३२५३७) | १७,००,००० | १६,७२,८३१ | -२७,१६९ |
| | ५ | तोंडाचे-पायाचे लसीकरण FMD (२४०३-२५४६) | - | २,३३,०१६ | +२,३३,०१६ |
| | ६ | शेळयांचे गट पुरविणे (२४०३-११९२) | - | २,५२,१२६ | +२,५२,१२६ |
| | ७ | पवैद संस्थांना औषधाचा पुरवठा करणे (२४०३-२५२८) | २,५५,२५० | २,१२,००० | -४३,२५० |
| III | आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपाय योजना | | | | |
| | १ | दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे (२४०३-१४३२) | १,००,००० | ९९,१३७ | -८६३ |
| | २ | अनुसूचित जाती/जमातीच्या कुटूंबांना शेळयांचे गट पुरविणे (२४०३-१४८८) | - | ९८,०९१ | +९८,०९१ |
| | ३ | पशुवैद्यकिय संस्थांना जीवरक्षक औषधी पुरवठा (२४०३-१४२३) | - | २५,००० | +२५,००० |
| IV | अनुसूचित जाती उपयोजना SCP | | | | |
| | १ | शेळयांचा गटाचा पुरवठा करणे (२४०३-१९४२) | - | २,३८,२२१ | +२,३८,२२१ |
| V | | अभिकरण योजनांतर्गत नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी सहाय्य (२२४५-००८४) | - | ६,४१,८०४ | +६,४१,८०४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| VI | केंद्र पुरस्कृत योजना | | | | |
| | १ | ॲस्कॅड अंतर्गत IEC प्रशिक्षण<br>१. केंद्र (२४०३-२३९५)<br>२. राज्य (२४०३-२७६२) | <br>८२,५००<br>२७,५०० | <br>३५,२९५<br>- | <br>-४७,२०५<br>-२७,५०० |
| | २ | राष्ट्रीय बुळकांडी रोग निर्मुलन योजना (२४०३-२४२१) | २०,००० | १९,८७१ | -१२९ |
| | ३ | आर्थिकदृष्टया महत्वाच्या रोगाचे लसीकरण करणे<br>१. केंद्र (२४०३२३८६)<br>२. (२४०३-२३५९) | <br><br>३०,०००<br>१०,००० | <br><br>७७,३५०<br>१०,००० | <br><br>-४७,३५०<br>- |
| | ४ | पशुवैद्यकिय संस्थाचे बळकटिकरण करणे<br>१. केंद्र हिस्सा (२४०३१८२१)<br>२. राज्य हिस्सा (२४०३१८३९) | <br>-<br>- | <br>९७,८००<br>२,९३,४०१ | <br>+९७,८००<br>+२,९३,४०१ |
| VII | राज्य योजनाअंतर्गत योजना | | | | |
| | १ | लाळखूरकूत रोग मुक्त प्रभाग तयार करणे २००३-२४१२ | १७,००,००० | ८,०८,२२९ | -८,९१,७७१ |
| | २ | शेतक-याच्या शेतावर वैरण २४०३-१४२३ | ३,७५,००० | २,६८,४६२ | -१,०६,५३८ |
| VIII | जिल्हा परिषद उपकर योजना | | | | |
| | १ | पशु वैद्यकिय दवाखाने औषधी पुरवठा. | ३००,००० | २९९९९५ | -५ |
| | २ | जनावरांना पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतर दयावयाची लस ५०% अनुदानावर | ५०,००० | ४१,९२५ | -८०७५ |
| | ३ | पशुवैद्यकिय दवाखाने, इमारत दुरुस्ती | १००,००० | - | -१००,००० |
| | ४ | पशुप्रदर्शन | ३,००,००० | २,०७,३८० | -९२,६५० |
| | ५ | गुराख्यांना प्रशिक्षण | १००० | - | -१००० |
| | ६ | पशुखाद्य मोहिम व वंध्यत्व शिबिर | १००० | - | -१००० |
| | ७ | जनावरांच्या विविध रोगांवरील लस वाहतूक करणे. | २,८०,००० | १,१०,७२८ | -१,६९,२७२ |
| | ८ | पशु वैद्यकिय दवाखण्यासाठी विद्युतीकरण | १००० | - | -१००० |
| | ९ | पशु वैद्यकिय दवाखाण्यासाठी आवश्यक नोंदवहया, केस पेपर छपाई. | ५०,००० | ११,६५० | -३८,३५० |
| | १० | पशु वैद्यकिय दवाखाण्यास खनिज मिश्रणे पुरवठा करणे. | १००० | - | -१००० |
| | ११ | पशु वैद्यकिय दवाखाण्यास जंतूनाशके पुरवठा. | १००० | ९२०५ | +८२०५ |
| | १२ | पशु वैद्यकिय दवाखाण्यास जिवनसत्वे पुरवठा करणे. | १००० | - | -१००० |

**भाग एक : गंभीर अनियमितता**

**-- स्थानिक क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(अ) खालील आक्षेप**

**<u>परि.क्रं.२) श्वानदंशानंतर पशुंना द्यावयाचे रक्षारब लस खरेदी व विनियोगातील अनियमितता बाबत.</u>**

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणात सदर विभागाने खालील नमुद केलेल्या प्रमाणकान्वये जिल्हा परिषद उपकरातून ५०% अनुदानावर श्वानदंशानंतर पशुंना द्यावयाचे रक्षारब लस खरेदी केलेली आहे.

प्र. क्र. २४१ दिनांक ३१/३/२०१२ रक्कम ४१९२५/-

पुरवठादाराचे नांव :- पराग एजन्सीज, नांदेड. पा. क्र. ५३९२, दि. ३०/३/२०१२.

लसीचा तपशिल :- १० मि.ली.
०५ मि.ली.
०१ मि.ली.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येतात.

१. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, शासन निर्णय क्र. DIS-१०/२००३/१३५९२/प्र.क्र.१८८/पदुम-४ दि. २६/११/२००८ (१५) अन्वये जिल्हा पातळीवर औषधी पुरवठा नियंत्रण व औषध तपासणी, इ. बाबत प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय समिती स्थापन करणे आवश्यक आहे व त्या समितीकडून तांत्रिक सल्ला घेवून नंतर लस खरेदि/पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारे जिल्हा पातळीवर श्वानदंशानंतरची रक्षारब खरेदि/पुरवठा आदेश देणेबाबत कार्यवाही केली नाही.

२. लसीकरणाचे वेळापत्रक, मात्रा, जनावरांचे वयोगटानुसार लसीची आवश्यक्ता, इ. तांत्रिक बाबींची माहिती लेखापरिक्षणात उपलब्ध करण्यात आले नसल्याने कुत्रा चावल्यानंरचे संबंधित कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय अधिका-यांचे शिफारस, मात्रासह अहवाल व त्यानंतर जमा व विनियोग, इ. चे सविस्तर तांत्रिक अहवालासह, विनियोग प्रमाणपत्रासह अनुपालन दर्शवावे.

३. सदर लस वाटपाबाबतच्या लाभार्थ्यांच्या पोचपावत्या लेखापरिक्षणात दर्शविल्या नाहीत. दर्शवून खात्री पटवावी.

खर्च रु. ४१,९२५/- आक्षेपाधीन ठेवण्यात येतो.

**-- स्थानिक क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(ब) खालील आक्षेप**

**-- निरंक --**

**-- स्थानिक क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(क) खालील आक्षेप**

-- निरंक --

-- शासकिय क्षेत्र --

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(अ) खालील आक्षेप**

**परि.क्र.३) वंध्यत्व निवारण शिबिरासाठीचे औषध खरेदिमधील अनियमितता बाबत.**

| | | |
|---|---|---|
| प्र. क्र. १२९२ | दि. ३१/३/२०१२ | रु. ६४९४२८/- |
| प्र. क्र. १२९९ | दि. ३१/३/२०१२ | रु. १६५०००/- |
| प्र. क्र. १३२० | दि. ३१/३/२०१२ | रु. ३०२५००/- |
| प्र. क्र. १३२३ | दि. ३१/३/२०१२ | रु. २४७५००/- |
| प्र. क्र. १३६८ | दि. ३१/३/२०१२ | रु. ७९०००/- |
| | | ------------------- |
| | | रु. १४,४३,४२८/- |
| | | ------------------- |

उपरोक्त प्रमाणकाद्वारे पशुसंवर्धन विभाग, जि.प. नांदेड यांनी सन २०११-१२ या वित्तीय वर्षात जिल्हयातील पशुधनाचे वंध्यत्व निवारणासाठीचे शिबिरात पशुवरील उपचारासाठी पुढिलप्रमाणे औषधी खरेदी करुन तालुका स्तरावर वितरीत करण्यात आले आहे.

| अ.क्र. | औषधीचे नाव | नग | रक्कम | साठा नोंदवही |
|---|---|---|---|---|
| १ | बोलस सेलप्रीम ५*४ | ५३०० | ३११४२८/- | १८ |
| २ | इंजक्शन व्हिटॅमिन ए, २ ml | ५००००० | ३३८०००/- | २१ |
| ३ | टॅब - प्रोफेन vet - १*१० | १०००० | १६५०००/- | २३ |
| ४ | व्हिटेन D३ पावडर १००gm | ११००० | ३०२५००/- | १७ |
| ५ | प्रोव्हिडॉन आयोडिन ५००ml | ५००० | २४७५००/- | १९ |
| ६ | इंजक्शन इन्व्हरमकेटिन ५०ml | २००० | ७९५००/- | २० |

याबाबत पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. लेखापरिक्षणात पशुसंवर्धन विभागाने जिल्हयातील तालुकानिहाय पशुंची प्रवर्गासह वंध्यत्व तपासणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही त्यामुळे पशुंचे प्रवर्गासह संख्येची आकडेवारी उपलब्ध झाली नाही, तरी जिल्हयातील एकुण पशुधन त्यातील मादी जनावरे संख्या व वंध्यत्व प्राप्त झालेली तालुकानिहाय मादी जनावरे यांचे तपशिलासह व उपचारासाठीचे शिबिरात वापरावयाचे औषधांचे प्रति जनावरांसाठीचे प्रमाण यानुसार झालेली औषध खरेदी योग्य असल्याचे दर्शवावे.

२. पशुच्या वंध्यत्व निवारणासाठी खरेदि करावयाची औषधी ही तज्ञ समितीच्या मान्यतेनेच खरेदी करावयाची असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

३. पशुवैद्यकिय दवाखाण्यासाठी वंध्यत्वाबाबत व उपचाराबाबतची योग्य ती अभिलेखे ठेवणे बंधनकारक असतांना अशी अभिलेखे ठेवल्याचे दिसुन आले नाही. ( उदा. मार्गदर्शक पुस्तिका, जननेंद्रिय तपासणी, रक्त तपासणी, सेल्युअली ट्रांसमिटेड डिसीजेसची तपासणी, हार्मोन्स एस्टिमेशन व तज्ञ समितीने सुचविलेली इतर तपासणी व त्यावर औषधोपचारांच्या नोंदि इ. बाबतची अभिलेखे)

४. जिल्हयामध्ये सन २०११-१२ मध्ये पशुचे वंध्यत्व निवारणासाठी किती प्रदर्शने/शिबिरे आयोजित झाली अथवा नाही, शिबिरे आयोजित झाली असल्यास वापरलेली औषधी याबाबत नोंदवहीसह अंतर्गतचे दवाखण्यांचे साठा नोंदवहीशी ताळमेळ दर्शवावा.

उपरोक्त उणीवांची पुर्तता दर्शवावी. तोपावेतो खर्च रु. १४,४३,४२८/- लेखापरिक्षणात तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

तात्पुरता अमान्य :- रु. १४,४३,४२८/-

१२ - पशुसंवर्धन,
वंध्यत्व निवारण शिबिरासाठी
औषधी खरेदी,
सन २०११-१२.

**परि.क्र. ०४) लाल खुरकत लसीकरण कार्यक्रमा अंतर्गत डिस्पोजल निडल व सिरींज खरेदी मधिल अनियमितता बाबत.**

| अ.क्रं. | प्र.क्रं./दिनांक | रक्कम | विवरण |
|---|---|---|---|
| १ | १३०४/३१.३.२०१२ | ८३००० | नॅशनल मेडीटेक दिल्ली<br>डिस्पोजल निडल ७७५७० नग दर १.०७ |
| २ | १३१९/३१.३.२०१२ | ६३०००० | विरीम,पुणे सिरीज ५ मीली ६०००० नग दर १०.५० |
| ३ | | ७१३००० | |

| अ.क्रं. | प्रशासकीय मान्यता | अति मु.का.अ.यांचे पत्र क्रं.दि.१८/१/२०१२ |
|---|---|---|
| २ | तांत्रिक मंजूरी | /- दि.१८/१/२०१२<br>प्रादे.पशूसवंर्धन सह उपआयुक्त लातुर क्रं. ८१३ दि.८/२/२०१२ |
| ३ | पुरवठा आदेश | अति.मु.का.अ. यांचे पत्र क्रं.१५२ दि.२६/१/२०१२<br>-/- १५४ दि.२६/१/२०१२ |
| ४ | योजनेतील उद्देश | जनावरांचा लाखुरकत रोगांचे नियत्रण करुन रोग मुक्त पट्टा निमार्ण करणे |

उपरोक्त प्रमाणे लालखुरकत रोगावरील लसीकरणा साठी डिस्पोजल निडल ७७५७०/- नगाचे रु. ८३०००/- व सिरीज ५ मीली ६००००/- नग रु ६३००००/- प्रमाणे एकुण रु ७१३०००/- ची खरेदी विभागाने केलेली आहे. त्यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) उपरोक्त डिस्पोजल निडल व सिरींजचे संचिके मध्ये अंतर्गत दवाखाने व तालुका पशुधन विकास अधिकारी यांचे मार्फत संख्येच्या प्रमाणात लसीकरणाचे साहित्याची मागणी बाबत उल्लेख नाही. त्यामुळे खरेदी कोणत्या आधारे करण्यात आली याचा मागणी पत्रासह व विनियोजन प्रमाणपत्रासह पूर्तता दर्शवावी.

२) लेखा संहिता १९६८ चे नियम ८३(३) प्रमाणे खरेदी पुर्वी विभाग प्रमुखानी साहित्याचे गुणवत्ता व दर्जा बाबत पडताळणी केली नाही. त्यामुळे दर्जा बाबत सांशकता निर्माण होते.

३) सदर साहित्याचे जिल्हा अंतर्गत तालुक्यांना वाटप करण्यात आलेले आहे. तरी त्यांचे विनियोगा बाबत व लाल खुरकत लसीकरण कार्यक्रमातील वाटपा बाबत. तांत्रिक तपासणी अहवालासह पुर्तता दर्शवावी.

४) तपासणी अहवालासह व उपयोगीता प्रमाणपत्रासह साहित्याचा विनियोग लसीकरण कार्यक्रमासाठीच झाल्या बाबत पुर्तता दर्शवावी.

खर्च रु. ७,१३,०००/- तात्पुरता अमान्य ठेवण्यात येतो.                                        १२ पशुसंवर्धन.

**परि.क्रं.(५) शेळी व गट वाटपातील अनियमितता बाबत.**

पंचायत समिती मुखेडचे सन २०११-१२ चे लेखा परिक्षणात विशेष घटक योजना अंतर्गत सन २०१०-११ साठी निवड झालेल्या १४ लाभार्थ्यांनी दि.२९.०३.११ ते ३१.०३.११ दरम्यान प्रत्येकी रु १४०१२/- प्रमाणे एकुण रु १९६१६८/- भरणा केल्याचे दिसुन आले तथापी सदरील लाभार्थ्या हिस्सा पंचायत समितीचे सर्वसाधारण रोख पुस्तीकेच्या पृष्ठ क्रंमाक ५८ वर दि.०३/०८/११ रोजी जमा घेवून अंतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश जा.क्रं./जिपनां/पशुसवि/ता.३/७८५/२०११ दि.३०/०६/११ नुसार सन २०१०-११ च्या आर्थीक वर्षात उपलब्ध झालेला निधी सन २०११-१२ या आर्थीक वर्षात खर्च करण्याची परवानगी दिल्यामुळे प्र.क्रं.९१ दि.०३/०८/११ प्रमाणे रु १८२१६९/- शासनअनुदान व ९२ दि.०३/०८/११ अन्वये रु १९६१६८/- व्दारे रक्कम रु ३७८३३७/- पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पं.स.मुखेड यांचे नावे दिली आहे. त्यातुन पशुधन विकास अधिकारी यांनी सदर रक्कमेचा धनादेश दि.१०.०८.११ रोजी रोखीत करुन दि.११/०८/११ रोजी अकरा व दि.२९/०८/११ रोजी दोन असे तेरा शेळी गट खरेदी करुन संबधित लाभार्थ्यांना वाटप केले आहेत व एका लाभार्थ्यास त्याने भरणा केलेला लाभार्थी हिस्सा रु १४०१२/- परत केला आहे. व सदरील योजनेसाठी देण्यात आलेल्या शासन अनुदानाचे रक्कमेचे प्र.क्रं.५३२/- दि.३१/०३/१२ अन्वये समायोजन केले आहे. यावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) शासन निर्णय क्रं.एमएसडीसी/१४०३/१८६२०/प्र.क्रं.१७५/२००३/पदुम ३ दि.१२.०१.२००४ नुसार दहा शेळया एक बोकडाच्या शेळी गटाची एकुण किंमत रु २८०२५/- ठरवलेली आहे. ज्यात प्रति बोकड रु २४००/- प्रति शेळी रु २१००/- शेड व साहित्य रु २२५/- गटा चा विमा रु १५८०/- बोकडासाठी खाद्य रु ६६०/- व शेळया साठी खाद्य रु २१६०/- समाविष्ट आहे. लेखा परिक्षणात सदरील योजनेच्या संचिकेची तपासणी केली असता शेळीगट खरेदी करुन शेड व साहित्य खरेदी व विमा काढला आहे. तथापी पशुधन विकास अधिकारी विस्तार पं.स.मुखेड यांचे पत्र क्रं. १७३ दि.०९/०३/१२ खाद्य पुरवठाधारक प्रणव ॲग्रो इंडस्ट्रीज पुणे यांनी दि.०९/०३/१२ पर्यत तरी खाद्य पुरवठा केलेला नव्हता व सदरील गटांची खरेदी दि.११/०८/११ व २९.०८.११ रोजीच झालेली आहे. त्यामुळे शेळीगंटांना वेळीच खाद्य पुरवठा न केल्यामुळे खाद्य पुरवठा करण्याचा हेतु सफल झालेला नाही. सबब खाद्यसाठी राखुन ठेवलेली रक्कम रु १८३३०/- शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

२) लेखा परिक्षणात सादर संचिकेची तपासणी केली असता सदर योजनेच्या एका लाभार्थीचा हिस्सा परत केल्याचे निदर्शनास आले आहे यावरुन लाभार्थ्यांची निवड करताना योग्य ते निकष न लावता लाभार्थी निवड केलेली दिसुन येते.

३) सदरील योजनेच्या लाभार्थ्यांनी दि. २९.०३.११ ते ३१.०३.११ या कालावधीत लाभार्थी हिस्सा भरणा केलेला असतांना प्रत्यक्षात सदरील रक्कमा दि.०३/०८/११ रोजी रोखपुस्तीकेत जमा घेण्यात आल्या आहेत.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १३ प्रमाणे पंचायत समितीच्या खात्यात जमा होणारी रक्कम तात्काळ रोख पुस्तीकेत जमा घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

४) लेखा परिक्षणात उपरोक्त योजनेसाठी लाभार्थी हिस्सा व शासन अनुदानाची रक्कमेची मागणी करताना पशुधनविकास अधिकारी (विस्तार) पं.स.मुखेड यांनी स्वतःच्या नावे रक्कम आहरण करुन संबधित शेळी व गट पुरवठादार व विमा कंपनी यांना रोखीने रक्कमा प्रदान केल्याचे दिसुन आले महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंयायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २९(४) प्रमाणे जिल्हा परिषद कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व

निवृत्ती धारकाचे निवृत्ती वेतन वगळता इतर रु १०००/- पेक्षा जास्त रक्कमेचे धनादेश विभाग प्रमुखाचे नावे काढु नये असे असतांना व संबधीत पुरवठाराचे नांवे धनादेश देणे आवश्यक असतांना सदरील योजनेची रक्कम पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नांवे मागविण्याबाबत व लेखा विभागानेही पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पं.स.मुखेड यांचे नांवे धनादेश दिल्यामुळे अनियमितता झाली आहे.

सबब उक्त अभिप्रायाची पुर्तता करे पावेतो रक्कम रु १८३३०/- अंतिम व रु ३६००७/- तात्पुरती अमान्य करण्यात येते.

अंतिम अमान्य रु १८३३०/-

तात्पुरते अमान्य रु ३६०००७/-

१२-पशुसवर्धन
विशेष घटक योजना
अंतर्गत शेळी गट पुरवठा
पंचायत समिती मुखेड

**परि.क्रं.(६) : संकरीत गायी पुरवठा करणे योजनेतील अनियमितता बाबत.**

पंचायत समिती मुखेडचे सन २०११-१२ चे लेखापरिक्षणात विशेष घटक योजना अंतर्गत सन २०१०-११ साठी निवड झालेल्या १० लाभार्थ्यानी दि.२९/०३/११ ते ३१/०३/११ दरम्यान प्रत्येकी रु २१०००/- प्रमाणे एकूण रु २१००००/- भरणा केल्याचे दिसुन आले तथापी सदरील लाभार्थ्या हिस्सा पंचायत समिती सर्वसाधारण रोख पुस्तीकेच्या पृष्ठ क्रंमाक ५८ वर दि.०३/०८/११ रोजी जमा घेवून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश क्रं. जाक./जिपना/पशुसवि/ता.३/७८५/२०११ दि.३०/०६/११ नुसार सन २०१०-११ च्या आर्थीक वर्षात उपलब्ध झालेला निधी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात खर्च करण्याची परवानगी दिल्यामुळे प्र.क्रं.९३ दि.०३/०८/११ प्रमाणे रु २१९४५०/- शासन अनुदान व ९४ दि.०३/०८/११ रु २१००००/- व्दारे रक्कम रु ४२९४५०/- पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पं.स.मुखेड यांचे नावे दिली आहे. त्यातुन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी सदर रक्कमेचा धनादेश दि.१०.०८.११ रोजी रोखीत करुन दि.११/०८/११ रोजी दहा गाय गट खरेदी करुन संबधित लाभार्थ्याना वाटप केले आहेत. व सदरील योजनेसाठी देण्यात आलेल्या शासन अनुदानाचे रक्कमे प्र.क्रं.५३२/- दि.३१/०३/१२ अन्वये समायोजन केले आहे. यावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) सदरील योजनेच्या लाभार्थ्यानी दि. २९.०३.११ ते ३१/०३/११ या कालावधीत लाभार्थी हिस्सा भरणा केलेला असतांना प्रत्यक्षात सदरील रक्कमा दि.०३/०८/११ रोजी रोखपुस्तीकेत जमा घेण्यात आल्या आहेत.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १३ प्रमाणे पंचायत समिती च्या खात्यात जमा होणारी रक्कम तात्काळ रोख पुस्तीकेत जमा घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

२) लेखा परिक्षणात उपरोक्त योजनेसाठी लाभार्थी हिस्सा व शासन अनुदानाची रक्कमेची मागणी करताना पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पं.स.मुखेड यांनी स्वतःच्या नांवे रक्कम आहरण करुन संबधित गाय गट पुरवठादार व विमा कंपनी यांना रोखीने रक्कमा प्रदान केल्याचे दिसुन आले महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २९(४) प्रमाणे जिल्हा परिषद कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन धारकाचे निवृत्ती वेतन वगळता इतर रु १०००/- पेक्षा जास्त रक्कमेचे धनादेश विभाग प्रमुखाचे नांवे काढु नये असे असतांना व संबधीत पुरवठाराचे नावे धनादेश देणे आवश्यक असतांना सदरील योजनेची रक्कम पशुधन विकास अधिकारी(विस्तार) यांचे नांवे

मागविण्याबाबत व लेखा विभागानेही पशुधन विकास अधिकारी (विस्तार) प.स.मुखेड यांचे नांव धनादेश दिल्यामुळे अनियमितता झाली आहे.

३) शासन निर्णय क्रं झेडपीए/१०-२००४/१८१०३/प्र.क्रं.३६७/पदुम/४ दि.०५/१०/२००४ परिशिष्ट ब मधील क्रं.११ नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी दर तिन महिन्यानी प्रत्येक जनावराची प्रत्यक्ष पाहणी करुन सद्यस्थिती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना देणे तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त व प्रादेशिक पशुसवर्धन सहआयुक्त यांनी किमान १० टक्के जनावराची पडताळणी करणे व लाभार्थ्याच्या समक्ष भेटी घेवून अडी-अडचणी समजावुन घेवून मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. तथापी अशी कार्यवाही केल्या बाबत संचिकेत पत्रव्यवहार आढळुन आला नाही.

सबब उक्त अभिप्रायाची पुर्तता करे पावेतो रक्कम रु ४२९४५०/- तात्पुरती अमान्य करण्यात येते.

तात्पुरते अमान्य रु ४२९४५०/-

१२-पशुसवर्धन
विशेष घटक योजना अंतर्गत गाय गट पुरवठा
पंचायत समिती मुखेड

**परि.क्रं. (७) विशेष घटक योजने अंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटपा बाबत.**

| अ.क्रं. | प्रमाणक क्रं.दिनांक | रक्कम , |
|---|---|---|
| १ | २८४/२६.३.१२ | १०९७२५/- अनुदान |
| २ | २८३१/-/- | १०५०००/- लोकवाटा |
| | | २१४७२५/- |

सन १०-११ मधील अखर्चीत अनुदान रु १०९७२५/- सन ११-१२ मध्ये खर्च केलेला आहे.

या बाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन १०-११ मधील अखर्चीत रक्कम रु ३०/६/११ नुसार खर्च करण्यास मंजूरी दिलेली आहे. तथापी सदरील खर्चास शासनाची मंजुरी प्राप्त झालेचे पत्र संचिकेत नाही.

२) वि.घ.यो अंतर्गत ५ लाभार्थ्याची निवड करुन रु २१०००/- प्रमाणे १०५०००/- लोकवाटा दि. २/४/११ रोजी भरणा केलेला आहे. लोकवाटा ३१/३/११ पुर्वी भरणा करणे आवश्यक होते. अशी कार्यवाही केलेली नाही.

३) लोकवाटा ३१/३/११ पुर्वी भरलेला नसतांनाही सन ११-१२ मध्ये सदरील अनुदान खर्चास मंजुरी दिलेली आहे.

४) होटाळा येथील ५ लाभार्थ्याची निवड केलेली आहे. सदरील निवडीस ग्राम सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

वरील बाबीची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तो पर्यत खर्च रु १०९७२५/- तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

तात्पुरताअमान्य १०९७२५/-

१२-पशुसवंर्धन
वि.घ.यो पं.स.नायगांव

**परि.क्रं. (८) शेळी गट व दुधाळ जनावरे गट खरेदी खर्चा बाबत.**

पंचातय समिती कंधार यांनी शेळी गट व दुधाळ जनावरे गट खरेदीवर पुढील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्रं. | प्रमाणक क्रं./दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ७० दि.५/७/११ | ४३८९०० | म्हैस गट खरेदी |
| २ | १७५दि.-/- | २१९४५० | गाय गट खरेदी |
| ३ | ११/२.११.११ | २१९४५ | -/- |
| ४ | ७१/५.७.११ | ११२१०४ | शेळी गट खरेदी |
| | | ७९२३९९ | |

सदरील शासन योजना सन २०१०-११ ची असुन अखर्चीत रक्कम सन २०१०-११ मध्ये राबविण्यात अति मुख्य कार्याकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश क्रं.जिपना/पशुवि/ता-३/२०११/ ७८५ दि.३०.६.११ अन्वये मंजूरी देण्यात आली उपरोक्त खर्चावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) कार्यालयाचे अर्धसमास पत्र क्रं.१२ दि.१३/८/१२ अन्वेय दुधाळ जनावरे गट व शेळी गट खरेदी करुनही मंजूरी संचिका उपलब्ध करण्यात आलेली नाही. मंजूरीची संचिका अभावी योजनेची प्रशासकीय मंजूरी तांत्रिक मंजूरी तपासता आली नाही.

२) आयुक्त पशू संवर्धन,महाराष्ट्र,राजय पुणे-१ यांचे मार्गदर्शक सुचना २०१०-११ आदेश क्रं. पशुधन-१/मा.सु/८८२/२०१०-११ पं.स.१३ दि.६/७/२०१०/प.स.-१३ दि.६/७/२०१० अन्वये लाभार्थीची पात्रता निवड निकष परि.क्रं. १ ते १० मध्ये नमूद केलेले आहे. लाभार्थी निवड संचिका अभावी उपरोक्त मार्गदर्शक निकषाप्रमाणे निवड झाली किंवा नाही याची तपासणी करता आली नाही.

३) उपरोक्त मार्गदर्शक आदेश परि.क्रं.२०,२१ २२ व २३ प्रमाणे पशूधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी दर तीन महिन्यानी योजनेतील प्रत्येक जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करुन सद्यास्थिती अहवाल जिल्हा पशू संवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांना देणे आवश्यक आहे अशी कार्यवाही झालेली नाही.

४) उपरोक्त आदेश परि.क्रं.२५ प्रमाणे या योजनेचा संपूर्ण,सखोल व स्वंयस्पष्ट अहवाल योजना,राबविल्या नंतरच्या पुढील वर्षातील जुन अखेर पर्यत आयुक्तालय,प्रादेशिक पशूसवंर्धन सह.आयुक्त यांना सादर करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झाल्याचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविले नाही.

वरील उणीवांच्या अनुषंगाने झालला खर्च रु ७९२३९९/- लेखा परिक्षणात तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

तात्पुरता अमान्य रु ७९२३९९/-

१२-संवर्धन
दुधाळ जनावरे खरेदी
प ं.स.कंधार

**परि.क्र. (९) विशेष घटक योजनांतर्गत शेळी गटांना लाभार्थीना खाद्य पुरवठा खर्चातील अनियमितता बाबत. (योजना वर्ष २०१०-११ )**

प्रमाणक क्र. १०८९, दि. ३१/३/२०१२, रु. ११२८०/- देयक क्र. १०५NGO/२१६९ दि. ३१/३/२०१२, १०९२ (किग्रॅ).

उपरोक्त प्रमाणकान्वये पंचायत समिती माहूरने (विघयो) शेळी गटांचे (०४) लाभार्थ्यांसाठी प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज, पुणे यांना खाद्य पुरवठा देयकापोटी प्रदान केले आहे. याबाबत पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. सदर योजनेच्या उद्दीष्टाप्रमाणे लाभधारक पशुपालकांना (विघयो) शेळी गटासाठी आवश्यक खाद्यपुरवठा न झाल्यामुळे शासन योजना सफल होण्यास्तव योग्य नियोजन झाले नसल्याचे स्पष्ट होते. प्रणव इंडस्ट्रिज, पुणे यांनी माहे. ९/२०१२ अखेरपर्यंत खाद्य पुरवठा केलेला नसल्याने उपरोक्त रकमेचा धनादेश पडून असल्याचे दिसते. केवळ मार्च अखेर खरेदिचा खर्च नोंदविण्यासाठीच देयक मंजूर करुन धनादेश तयार केल्याचे स्पष्ट होते.

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. पं.रा.स./प्र.क्र. ५०१३/३८ दि. ३०/०३/२००० अन्वये वर्ष अखेरीस आवश्यक नियोजनाअभावी खर्च केल्यास कडक कार्यवाही करण्याची तरतुद आहे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता दर्शवावी.

तात्पुरता अमान्य खर्च :- रु. ११२८०/-

१२ पशुसंवर्धन,
अभिकरण योजना,
विशेष घटक योजना,
शेळी गट खाद्य पुरवठा खर्च,
प.स. माहुर. सन २०११-१२.

**परि.क्र. (१०) आदिवासी उपयोजनेअंतर्गत दूधाळ जनावरे गटांना खाद्यपुरवठा खर्चातील अनियमितता बाबत. (योजना वर्ष २०१०-११)**

प्रमाणक क्र. १०८७, दि. ३१/०३/२०१२, रु. ४५१११/-

देयक क्र. १०५NGO/२१६९, दि. ३१/०३/२०१२.

उपरोक्त प्रमाणकान्वये पंचायत समिती माहूरने टि. एस्. पी. दूधाळ जनावरे गटांचे (१६) लाभार्थीना प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज, पुणे यांना खाद्य पुरवठा देयकापोटी प्रदान केले आहे. याबाबत पुढिल प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. सदर योजनेच्या उद्दीष्टांप्रमाणे लाभधारक पशुपालकांना दूधाळ जनावरांचे गटासाठी आवश्यक खाद्य पुरवठा न झाल्यामुळे शासन योजना सफल होण्यास्तव योग्य नियोजन झाले नसल्याचे स्पष्ट होते. प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज, पुणे यांनी माहे. ०९/२०१२ अखेरपर्यंत खाद्य पुरवठा केलेला नसल्याने उपरोक्त रकमेचा धनादेश पडून असल्याचे दिसते. केवळ मार्च अखेर खरेदीचा खर्च नोंदविण्यासाठीच देयक मंजूर करुन धनादेश तयार केल्याचे स्पष्ट होते.

२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. पं.रा.स. - १०२०/प्र.क्र.५०१३/३८, दि. ३० मार्च २००० अन्वये वर्षाअखेरीस आवश्यक नियोजनाअभावी खर्च केल्यास कडक कार्यवाही करण्याची तरतूद आहे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता दर्शवावी.

तात्पुरता अमान्य खर्च रु. ४५१११/-

१२ पशुसंवर्धन,
अभिकरण योजना,
टि. एस्. पी. योजनेअंतर्गत
दुधाळ जनावरे, गट पुरवठा खर्च.
पं. स. माहूर, सन २०११-१२.

**परि.क्र. (११) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी लाभार्थ्यांचे शेळी गटांना खाद्य पुरवठा खर्चातील अनियमितता बाबत. (योजना वर्ष २०१०-११)**

प्रमाणक क्र. १०८८, दि. ३१/०३/२०१२, रु. १९७४०/-
देयक क्र. १०५NGO/२१६९, दि. ३१/०३/२०१२, १९११ (किग्रॅ)

उपरोक्त प्रमाणकान्वये पंचायत समिती माहूरने (ओ.टि.एस्.पी.) शेळी गटाचे (०७) लाभार्थींसाठी प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज, पुणे यांना खाद्य पुरवठाचे देयकापोटी प्रदान केले आहे. याबाबत पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. सदर योजनेच्या उद्दीष्टांप्रमाणे लाभधारक पशुपालकांना (ओ.टि.एस्.पी.) शेळी गटासाठी आवश्यक खाद्य पुरवठा न झाल्यामुळे शासन योजना सफल होण्यास्तव योग्य नियोजन झाले नसल्याचे स्पष्ट होते. प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज, पुणे यांनी माहे. ०९/२०१२ अखेरपर्यंत खाद्य पुरवठा केलेला नसल्याने उपरोक्त रकमेचा धनादेश पडून असल्याचे दिसते. केवळ मार्च अखेर खरेदीचा खर्च नोंदविण्यासाठीच देयक मंजूर करुन धनादेश तयार केल्याचे स्पष्ट होते.
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. पं.रा.स. - १०२०/प्र.क्र.५०१३/३८, दि. ३० मार्च २००० अन्वये वर्षाअखेरीस आवश्यक नियोजनाअभावी खर्च केल्यास कडक कार्यवाही करण्याची तरतूद आहे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता दर्शवावी.

तात्पुरता अमान्य खर्च रु. १९७४०/-

१२ पशुसंवर्धन,
अभिकरण योजना,
ओ. टि. एस्. पी.
(शेळी गट खाद्य पुरवठा खर्च)
पं. स. माहूर, सन २०११-१२.

**परि.क्र. (१२) विविध योजनेअंतर्गत शितपेटया खरेदितील अनियमितताबाबत.**

प्र. क्र. १३१४, दि. ३१/०३/२०१२, रु. १९५७५०/-     गुस्टो फॉर्मा, औरंगाबाद.
पा. क्र. १२२, दि. १८/०१/२०१२.
रेफ्रिजरेटर - १२ नग, दर - रु. १६३१२/-

उपरोक्त प्रमाणकान्वये मे. गुस्टो फॉर्मा, औरंगाबाद यांना १२ नग २१५.२३० लिटरचे व्हिडीओकॉन कंपनीचे रेफ्रिजरेटर पुरवठयापोटी रक्कम १९५७५०/- अदा केली आहे.

प्रशासकीय मान्यता - अति मु.का.अ.पत्र क्र निरंक दिनांक २६/११/२०११ रु २ लाख
तांत्रिक मंजूरी - प्रादे. पशुसवंर्धन सहआयुक्त लातूर पत्र क्र ८१६ दि ८/२/२०१२.
साठा नोंदवही - पृष्ठ क्र २९.

उपरोक्त १२ नगाचे रेफ्रिजरेटर खरेदिबाबत पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्र. DIS-२००९/प्र.क्र. ४३५/पदुम-४, दिनांक ५ मार्च २०१०, अ. क्र. १८ अन्वये उपकरणांची चाचणी शासकिय चाचणी प्रयोग शाळेतुन किंवा ईतर शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून करुन घेणे अनिवार्य असल्याचे नमुद असतांना

पशुसंवर्धन विभागाने खरेदि केलेल्या शितपेटयांचे चाचणी अहवाल लेखापरिक्षणात दिसून आले नाहीत.

खर्च रु. १९५७५०/- तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

तात्पुरता अमान्य खर्च रु. १,९५,७५०/-

१२ पशुसंवर्धन.

**-- शासन क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(ब) खालील आक्षेप**

**परि.क्रं. (१३) आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ (२४ वर्ष सेवा) देताना चुकीची वेतन निश्चिती केल्यामुळे झालेल्या अतिप्रदाना बाबत.**

पंचायत समिती हिमायतनगर सन २०११-१२ चे लेखापरिक्षणात पशुधन विकास अधिकारी हिमायतनगर यांचे कार्यालयातील कर्मचारी श्री. काशीनाथ जळबा बायेवार,पटीबंधक यांचे सेवा पुस्तकाची तपासणी केली असता त्यांना आश्वासीत प्रगती योजनेचा २४ वर्षे सेवेचा दुसरा लाभ देतांना दि.०१.०७.०९ मुळवेतन ८०१० ग्रेड वेतन १९०० अनुज्ञेय असतांना प्रत्यक्ष प्रदान मुळ वेतन ९७१० ग्रेड वेतन १९००/- या प्रमाणे वेतन निश्चिती केल्यामुळे दि. १/४/२०१० पासुन मुळ वेतन १७००/- प्रमाणे अति प्रदान झालेले आहे.

तरी सोबत जोडलेल्या विवरण पत्रा नुसार दिनांक.१/४/२०१० पासुन दि.३०/०९/२०१२ या कालावधीत अतिप्रदान झालेली रक्कम रु ८६२०७/- संबधिता कडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे. तो पावेतो रक्कम रु ८६२०७/- अंतिम अमान्य करण्यात येतो.

अंतिम अमान्य रु ८६२०७/-

१२-पशुसवंर्धन
वेतन व भत्ते
पं.स.हिमायतनगर

**परि.क्र. (१४)** अनुज्ञेय रक्कमेपेक्षा घरभाडे भत्त्याची जादा वजावट दर्शवून कमी भरणा केलेल्या आयकराची रक्कम शासन खाती जमा करणे बाबत.

पंचायत समिती मुदखेडचे सन २०११-१२ चे लेखापरिक्षणात पशुवैदयकिय दवाखाना बारड यांना खालील प्रमाणकान्वये माहे फेब्रु. २०१२ चे वेतन व भत्ते प्रदान केले आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १२.३.२०१२ | ५६५६४ | वेतन माहे फेब्रु. २०१२ |
| २ | १४ | १२.३.२०१२ | ४२४३८ | वेतन माहे फेब्रु. २०१२ |
| ३ | १३ | १२.३.२०१२ | १२३६९६ | वेतन माहे फेब्रु. २०१२ |

उपरोक्त प्रमाणकान्वये नोंदविलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

१. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १० (१३ A) अन्वये आयकराची परिगणना करण्याकरिता कर देय उत्पन्नाचे आगणन करतांना खालीलप्रमाणे घरभाडे भत्त्याची सुट अनुज्ञेय ठरते.

1. प्रत्यक्षात मिळालेला घरभाडे भत्ता, किंवा
2. प्रत्यक्षात दिलेले घरभाडे वजा वेतनाच्या १०% रक्कम, किंवा
3. वेतनाच्या ( मुळवेतन +ग्रेडवेतन+महागाई भत्ता ) ४०% रक्कम.

या तिन्ही पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम कलम १० (१३ अ) अन्वये कर देय वेतनातून प्रत्यक्ष सुट मिळण्यास पात्र आहे.

तथापि खालील विवरण पत्रामध्ये दर्शविलेल्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष घरभाडे भरल्याच्या पावत्या देयकासोबत जोडलेल्या नाहीत व घरभाडे प्रदान केलेली रक्कम नमुद नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मिळालेल्या घरभाडे भत्त्याची सुट अनुज्ञेय ठरत नाही. खालील तपशिलाप्रमाणे कमी आयकर भरणा केलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | प्रत्यक्ष मिळालेला घरभाडे भत्ता | सुट घेतलेली रक्कम | कमी भरलेली आयकर रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गोविंद दे. चिकलेवार | २०९७० | २०९७० | २१६० |
| २ | चव्हाण आर. सी. | २२६७० | २२६७० | २३३५ |
| ३ | गुंटुरकर ए. बी. | २७९०५ | २७९०५ | २८७४ |
| ४ | महंमद अजगर म. यासीन | २३४२० | २३४२० | २४१२ |
| | | | एकुण | ९७८१ |

तरी कमी भरणा केलेली आयकराची रक्कम रु. ९७८१ संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत रक्कम रू. ९७८१ अंतिम अमान्य् करण्यात येते.

अंतिम अमान्य् रु. ९७८१/-

१२ पशुसंवर्धन,
वेतन व भत्ते,
प.स. मुदखेड.

**परि.क्र.(१५) वेतन व भत्ते देयकांच्या प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत**

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| २९ | ०२-०२-१२ | ४२८४१ | वेतन माहे जानेवारी २०१२ |
| ११३ | २३-०२-१२ | १६९२३२ | रजावेतन श्री.तिवाडकर पी.डी. |
| २४ | १२-०३-१२ | ४२८४१ | वेतन माहे फेब्रुवारी २०१२ |
| | एकुण | २५४९१४ | |

पंचायत समिती अर्धापुरचे सन २०११-१२ चे लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकाद्वारे पशुवैद्यकीय दवाखाना मालेगावचे वेतन व भत्ते देयकांचे प्रदान केल्याचे दिसुन आले यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) उक्त वेतन देयकांचे प्रदान करताना निव्वळ देय रक्कम व व्यवसायकर, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था चे कपातीची रक्कम मिळुन पशुधन विकास अधिकारी पशुवैद्यकीय दवाखाना मालेगाव यांचे नावे धनादेश दिला आहे संबंधीतांनी सदरील रक्कमेपैकी निव्वळ देय रक्कम धनादेशाद्वारे संबंधित कर्मचा-यांची खाती जमा केल्याचे दर्शविले आहे तथापी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७७(२) तथा महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.डी.डी.ओ.१००५/प्र.क्र.५/कोषा-प्रशा-५ दि.२९ ऑगस्ट २००५ चे परि.क्र.६ प्रमाणे संबंधीत कर्मचा-यांची वेतन प्राप्त झाल्याबाबत वाटप रजीष्टर (ॲक्वीटंस रोल) वर स्वाक्षरी घेतल्याचे आढळुन आले नाही.
2) उक्त वेतन देयकांमध्ये माहे फेब्रुवारी २०१२ चे वेतन देयकात रु.३००/- प्रमाणे तिन कर्मचा-यांच्या वेतनातुन व्यवसायकर कपात केल्याचे नमुद केले आहे तथापी सदरील वेतन देयकातुन कपात केलेल्या व्यवसायकराचा भरणा चलन तपासले असता त्यात रु.२००/-प्रमाणे व्यवसाय कर भरणा केला आहे त्यामुळे प्रत्येकी रु.१००/- प्रमाणे सदरील कर्मचा-यांना जादा प्रदान झाले आहे ते संबंधिताकडुन वसुल करुन व्यवसायकरखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

3) उपरोक्त वेतन देयकातुन व्यवसायकर, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था व आयकराच्या रकमा कपात केल्या आहेत तथापी माहे फेब्रुवारी २०१२ चे वेतन देयकातील व्यवसायकर भरणा वगळता इतर कपातीची भरणा चलने लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. पुर्तता दर्शवावी.

4) लेखापरीक्षणात उपरोक्तपैकी प्र.क्र.११३ ची तपासणी केली असता त्यात पशुधन विकास अधिकारी, वैद्यकिय दवाखाना निवघा, ता. हदगाव यांचे क्र. १२ दि. २७.२.२०११ (झेरॉक्स प्रत) अन्वये निर्गमित केलेल्या नादेय प्रमाणपत्रात सहावा वेतन आयोग थकबाकीबाबत उल्लेख असतांना प्रत्यक्षात देयक मात्र पाचव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीप्रमाणे केलेली आहे. म्हणजे सहाव्या वेतन आयोगातील थकबाकित संबंधीतास दुबार अदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) उक्त थकबाकी देयक पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे असल्यामुळे संबंधीतास पाच टक्के प्रमाणे घरभाडे भत्ता अदा करणे आवश्यक असताना दहा टक्के प्रमाणे केल्यामुळे संबंधीतास १७ महिन्यासाठी रु.३३०/- जादा दराने एकुण रक्कम रु.५६१०/- चे जादा प्रदान झाले आहे ते संबंधिताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

6) लेखापरीक्षणात श्री.तिवाडकर पी.डी.यांच्या मुळसेवापुस्तीकेची तपासणी केली असता संबंधीत दि.१२-११-०८ ते ०३-०२-२०११ या कालावधीत रजेवर असल्याचे आढळुन आले महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (वेतन) चे नियम ३९ प्रमाणे एक वर्ष सेवाकालावधीनंतर वेतनवाढ ज्या तारखेस लागु होत त्या महिन्याच्या एक तारखेपासुन ती प्रत्यक्षात दिली जाते वेतनवाढीच्या तारखेस तो कर्मचारी रजेवर असेल तर त्यास रजा वेतनामध्ये वेतनवाढीसह वेतन दिल्या जात नाही तो रजेवरुन कामावर हजर होईल तेव्हापासुनच वेतनवाढीसह वेतन अनुज्ञेय ठरते असे असताना सदरील रजेच्या कालावधीतील संबंधीताच्या वेतनवाढी (दि.०१-०७-०९ व ०१-०७-१० )मंजुर करुन थकबाकीचे प्रदान केले आहे तरी सदरील वेतनवाढीची रक्कम व त्यावरील भत्याची परिगणना करुन संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) लेखापरीक्षणात उक्त देयकांची तपासणी केली असता सदरील देयके पंचायत समितीच्या लेखाशाखेत प्राप्त झाल्यानंतर पुर्वतपासणीमध्ये केवळ कनिष्ठ लेखाधिकारी यांनीच तपासणी करुन देयक सरळ गटविकास अधिकारी यांच्या मंजुरीसाठी पाठविले आहे पंचायत समिती अर्धापुर येथे सहायक लेखाधिकारी पद मंजुर असताना त्यांची स्वाक्षरी न घेताच देयक मंजुरीसाठी पाठविण्याबाबत व सक्षम अधिकारी यांची तपासणी नसताना देयक मंजुरीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

सबब उक्त अभिप्रायाची पुर्तता करेपावेतो रक्कम रु.५९१०/-अंतिम व रु.२४९००४/-तात्पुरती अमान्य करण्यात येते.

अंतिम अमान्य रु. ५९१०/-

तात्पुरता अमान्य रु. २,४९,००४/-

१२ पशुसंवर्धन,

**<u>परि.क्र. (१६) वेतन व भत्ते देयकातील अनियमितताबाबत.</u>**

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १९ | ०२-०२-१२ | ६२५७३ | वेतन माहे जानेवारी २०१२ |
| ७० | १०-०२-१२ | २२८७ | रजा वेतन नाईकवाडे व्ही.एन. |
| १९१ | २८-०२-१२ | ३०२४२ | सहावा वेतन आयोग फरक भ.नि.नि.जमा तिसरा हप्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| १९६ | २८-०२-१२ | १२५३ | सहावा वेतन आयोग फरक अंशदान |
| २९ | १२-०३-१२ | ७२१७६ | वेतन माहे फेब्रुवारी २०१२ |
| | एकुण | १६८५३१ | |

पंचायत समिती अर्धापुरचे सन २०११-१२ चे लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकाद्वारे पशुधन विकास अधिकारी कुक्कुटपालन प्रकल्प या कार्यालयाचे वेतन व भत्ते देयकांचे प्रदान केल्याचे दिसुन आले यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. उपरोक्त वेतन देयकातुन व्यवसायकर, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था व आयकराच्या रकमा कपात केल्या आहेत तथापी कपातीची भरणा चलने लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. पुर्तता दर्शवावी.
2. लेखापरीक्षणात उपरोक्तपैकी प्र.क्र.७० ची तपासणी केली असता त्यात संबंधितास ५१ टक्के दराने महागाई भत्ता प्रदान करणे आवश्यक असताना ५८ टक्के दराने प्रदान केल्यामुळे संबंधीतास रक्कम रु.९३/-चे जादा प्रदान झाले आहे ते संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.
3. उपरोक्त वेतन देयकांची तपासणी केली असता त्यात विविध कर्मचा-यांचे वेतन आहरण केल्याचे दिसुन आले तथापी संबंधित कर्मचा-यांच्या मुळसेवापुस्तीका लेखापरीक्षणास सादर केल्या नाहीत त्यामुळे आहरीत वेतनाची तसेच सहावा वेतन आयोग थकबाकी प्रदानाच्या नोंदिंची तपासणी करता आली नाही.
4. आयकर अधिनियम १९६१ चे सेक्शन १० (१३ ए ) प्रमाणे घरभाडेसाठी सुट घेताना अ) ५० टक्के वेतन ब) प्रत्यक्ष घेतलेले घरभाडे क) प्रत्यक्ष इमारत घरमालकास अदा केलेले घरभाडे वजा १० टक्के स्थुल वेतन या तिन्हीपैकी जे कमी असेले तेवढी सुट अनुज्ञेय आहे व आयकर विवरणपत्रासोबत इमारत मालकाची रक्कम मिळाल्याची पोचपावती जोडणे आवश्यक आहे (दरमहा रु.३०००/- पेक्षा जास्त भाडे असेल तर ) तथापी उपरोक्तपैकी प्र.क्र.२९ च्या सोबत जोडलेल्या आयकर विवरणपत्रांची तपासणी केली असता श्री.पी.यु.देशमुख, सहायक पशुधन विकास अधिकारी यांनी घरभाडेसाठी रु.३०७९२/- ची सुट घेतली आहे तथापी त्याबाबत घरभाडे इमारत मालकाची पावती सोबत जोडली नाही अथवा लेखापरीक्षणातही दर्शवली नाही त्यामुळे संबंधीताकडुन रु.१३८३७/- आयकर कपात करणे आवश्यक असताना केवळ रु.१०६७०/- कपात केल्यामुळे संबंधीतास रु.३१६७/-चे जादा प्रदान झाले आहे ते संबंधिताकडुन वसुल करुन आयकरखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.
5. लेखापरीक्षणात उक्त देयकांची तपासणी केली असता सदरील देयके पंचायत समितीच्या लेखाशाखेत प्राप्त झाल्यानंतर पुर्वतपासणीमध्ये केवळ कनिष्ठ लेखाधिकारी यांनीच तपासणी करुन देयक सरळ गटविकास अधिकारी यांच्या मंजुरीसाठी पाठविले आहे पंचायत समिती अर्धापुर येथे सहायक लेखाधिकारी पद मंजुर असताना त्यांची स्वाक्षरी न घेताच देयके मंजूर करणे नियमबाह्य आहे.

सबब उक्त अभिप्रायांची पुर्तता करेपावेतो रक्कम रु.३२६०/- अंतिम व रु.१६५२७१/- तात्पुरती अमान्य करण्यात येते.

अंतिम अमान्य रु.३२६०/-

तात्पुरते अमान्य रु.१६५२७१/-

१२ पशुसंवर्धन,
कुक्कुटपालन प्रकल्प,
वेतन व भत्ते,
पंचायत समिती अर्धापुर.

**परि.क्र.(१७) निवासस्थानाचे विद्युत देयक शासन निधीतुन भरणा करणे बाबत**

पंचायत समिती अर्धापुरचे सन २०११-१२ चे लेखापरीक्षणात कुक्कुटपालन प्रकल्प कार्यालयाच्या प्र.क्र.५०६ दि.३१-०३-१२ द्वारे रक्कम रु.३३५०/-ची विद्युत देयकांचे प्रदान केल्याचे दिसुन आले यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. लेखापरीक्षाणात सदरील देयकाची तपासणी केली असता त्यात त्यातील ग्राहक क्र.५५००२००००१५ व ५५००२००००२३ ची एकुण रु.१४३०/- ची देयके शासकीय निवासस्थानाची असल्याची दिसुन आले त्यामुळे सदरील विद्युत बिले त्या शासकीय निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांनी स्वतः भरणे आवश्यक आहे त्यास शासकीय निधी अनुज्ञेय नाही तरी आता संबंधीताकडुन रक्कम रु.१४३०/- वसुल करुन शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2. लेखापरीक्षणात उक्त देयकांची तपासणी केली असता सदरील देयके पंचायत समितीच्या लेखाशाखेत प्राप्त झाल्यानंतर पुर्वतपासणीमध्ये केवळ कनिष्ठ लेखाधिकारी यांनीच तपासणी करुन देयक सरळ गटविकास अधिकारी यांच्या मंजुरीसाठी पाठविले आहे पंचायत समिती अर्धापुर येथे सहायक लेखाधिकारी पद मंजुर असताना त्यांची स्वाक्षरी न घेताच देयके मंजूर करणे नियमबाह्य आहे.
   सबब उक्त अभिप्रायाची पुर्तता करेपावेतो रक्कम रु.१४३०/- अंतिम अमान्य करण्यात येते.
   अंतिम अमान्य रु.१४३०/-

१२ पशुसंवर्धन
कुक्कुटपालन प्रकल्प
विद्युत बिल भरणा
पंचायत समिती अर्धापुर

**<u>परि.क्र. (१८) महाराष्ट्र दर्शन सवलत योजनेतील अदाईबाबत.</u>**

सोबतच्या तपशिलात दर्शविल्याप्रमाणे रु. ३७७५० महाराष्ट्र दर्शन सवलत योजनेचा लाभ घेतलेबाबत रक्कम अदाई करण्यात आलेली आहे.

याबाबत पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र दर्शन सवलत योजना देयक अ. क्र. १ मध्ये आई व वडील व अ. क्र. २मध्ये आई यांचा समावेश आहे. सदरील रक्कम अनुज्ञेय होत नाही. रू. ३५८२ वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2. वित्त विभाग शासन निर्णय क्र. प्र. स./ १९४/१८४ सेवा ५ दि. २८ मार्च १९९५ अन्वये ४ वर्षातून एकदा रजा प्रवास सवलत अनुज्ञेय आहे. सदरील प्रवास जवळच्या मार्गाने व तिकिट भाडे आधारावर अनुज्ञेय आहे. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

वरील बाबींची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत खर्च रु. ३५८२ अंतिम अमान्य व रु. ३४१६८ तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

अंतिम अमान्य् - रु. ३५८२/-
तात्पुरता अमान्य् - रू ३४१६८/-

१२ पशुसंवर्धन

| अ. क्र. | प्र. क्र./दिनांक | रक्कम | पासून - पर्यत | तिकिट | नाव | आदेश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११७/ २०.३.२०१२ | ५३८२ | दगडसांगवी ते हरिहरेश्वंर | ११९६ | पी. एम. घुटे | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी क्र. १८९६/२२.१२.११ |
| २ | १२१/ २०.३.२०१२ | ३५७० | माळेगाव ते हरिहरेश्वंर | ११९० | काळगोरे | ३८८/३.३.१२ |
| ३ | २१८/ २६.३.२०१२ | ५९६० | लोहा ते हरिहरेश्वंर | ११९२ | डी. एस. केंद्रे | ३९०/३.३.१२ |
| ४ | १९३/ २६.३.२०१२ | ५३८२ | माळाकोळी ते हरिहरेश्वंर | ११९६ | डी. एन. केंद्रे | ३९३१/३.३.१२ |
| ५ | २१५/ २६.३.२०१२ | २३८२ | आष्टूर ते हरिहरेश्वंर | ११९१ | ए. वी. झाडे | ३८५/३.३.१२ |
| ६ | २१६/२६.३.२०१२ | ४१८६ | लोहा ते हरिहरेश्वंर | ११९२ | एस.एस.जोंधळे | ३८६/३.३.१२ |
| ७ | २१७/२६.३.२०१२ | ४७६८ | रामवाडी ते हरिहरेश्वंर | ११९२ | जी.डी.मठपनी | ३८९/३.३.१२ |
| ८ | २३३/२६.३.२०१२ | ६१२० | सोनखेड ते हरिहरेश्वंर | ११९२ | स हमीद | ३८७/३.३.१२ |
| | | ३७७५० | | | | |

**<u>परि.क्र. (१९) अपंग भत्ता जादा अदाई बाबत.</u>**

| प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| ८० | २२/२/१२ | ८४५२/- |

पशुवैद्यकिय दवाखाना बरबडा श्री. व्ही.एस.गिरी (पटींबधक) यांना ६/११ ते १/१२ या कालावधीतील अंपग भत्ता फरक रु १०००/- प्रमाणे अदाई केलेला आहे.

अपंग भत्ता अदाई करण्यापूर्वी अंपग भत्ता या पूर्वी दिलेला व आता देणे या बाबत फराकाचे विवरण पत्र तयार करुन अदाई करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ६/११ ते १/१२ या कालावधील पुर्वी आहरण केलेला भत्ता रु १२७५/- कमी करुन अदाई करणे आवश्यक होते. कमी न केल्यामुळे रु १२७५/- जादा अदाई झालेली आहे. रु १२७५/- वसुल करुन अनुपालन दर्शावावे. तोपर्यत रु १२७५/- अंतिम अमान्य करण्यात येते.

अंतिम अमान्य रु १२७५/-

१२ पशुसवंर्धन,
पं.स.नायगांव.

**परि.क्र. (२०) पशु सवंर्धन दवाखाण्यातील कर्मचा-यांना घरभाडे भत्ता/अनुज्ञप्ती शुल्काची जादा अदाई बाबत.**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय वित्त विभाग क्रं.घसाव २०१०/प्र.क्रं.४/सेवा-५/दि.१९ एप्रिल २०११ अन्वये कर्तव्यासाठी दिलेल्या शासकीय निवासस्थाना साठी शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणीत भाडे हया पैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क दयावे लागते तथापी पशुसंवर्धन दवाखाण्यातील कर्मचा-यांना घरभाडे भत्ता/ अनुज्ञाप्ती शुल्कजादा अदाई करण्यात आली आहे.

| अ.क्रं. | प्र.क्रं./दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ६५/३.२.१२ | ४०६०८ | वेतन व भत्ते माहे ४/१२ पशु दवाखाना |
| २ | ७२/९.३.१२ | १३९६७ | -/- १२/११ |
| ३ | २६७/२६.३.१२ | ४०२१८ | -/- २/१२ -/- |
| ४ | ७१/३.२.१२ | ४९९०० | -/- १/१२ पशु/- |
| ५ | २७१/२६.३.१२ | ४९११५ | -/- २/१२ -/- |
| ६ | ७२/३.२.१२ | ३६७९१ | -/- पशु वाटपा बाबत. |
| ७ | २६६/२६.३.१२ | ३६५९१ | -/- २/१२ -/- |
| | एकुण | २६७१९० | |

**पशुसंवर्धन दवाखाना करुळा**

| अ.क्रं. | कर्मचा-यांचे नांव | मुळ वेतन | ग्रेडपे | एकूण | १० टक्के घरभाडे | दिलेले घरभाडे | जादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्हि.के.हांडे बाग एल.एस.एस | ११८२० | २४०० | १४२२० | १४२२ | १८८२ | ४६० |
| २ | एस.एम.गायकवाड ड्रेसर | ७९७० | १६०० | ९५७० | ९५७ | ११७७ | २२० |
| ३ | इब्राईम बद्रुउद्यीन शिपाई | ८४४० | १४५० | ९८९० | ९८९ | १२०६ | २१७ |
| ४ | एस.एम.गायकवाड ड्रेसर | ७९७० | १६०० | ९५७० | ९५७ | ११७७ | २२० |
| ५ | व्हि.के.हांडेबाग एलएसएस | ११८२० | २४०० | १४२२० | १४२२ | १८८२ | ४६० |
| ६ | एस.एम.गायकवाड ड्रेसर | ७९७० | १६०० | ९५७० | ९५७ | ११७७ | २२० |
| ७ | इब्राहिम बद्रुउद्यीन शिपाई | ८४४० | १४५० | ९८९० | ९८९ | १२८६ | २१७ |
| | | | | | | | २०१४ |

**पशुसंवर्धन दवाखाना काटकंळबा**

| अ.क्रं. | कर्मचा-यांचे नांव | मुळ वेतन | ग्रेडपे | एकूण | १० टक्के घरभाडे | दिलेले घरभाडे | जादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिलानी जलाल साब सय्यद ड्रेसर | ८६०० | १६०० | १०२०० | १०२० | १२४० | २२० |
| २ | शब्बीर लाल शिपाई | ८४२० | १४५० | ९८७० | ९८७ | १२०७ | २२० |
| ३ | डी.जे.अमीलकंटवार -/- | ५१८० | १३०० | ६४८० | ६४८ | ८६८ | २२० |
| ४ | जिलानी जलाल साब सय्यद ड्रेसर | ८६०० | १६०० | १०२०० | १०२० | १२४० | २२० |
| ५ | शब्बीर लाल भाई | ८४२० | १४५० | ९८७० | ९८७ | १२०७ | २२० |
| ६ | डी.जे.अमीलकंटवार -/- | ५१८० | १३०० | ६४८० | ६४८ | ८६८ | २२० |

## पशुसंवर्धन दवाखाना पेठवडज

| अ.क्रं. | कर्मचा-यांचे नांव | मुळ वेतन | ग्रेडपे | एकूण | १० टक्के घरभाडे | दिलेले घरभाडे | जादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ए.ए.गोरे एल.एस.एस. | ९८३० | २४०० | १२२३० | १२२३ | १५१० | २८७ |
| २ | एम.एन.सुर्यवंशी ड्रेसर | ८६०० | १६०० | १०२०० | १०२० | १२४० | २२० |
| ३ | बी.व्ही.नागरगोजे शिपाई | ७११० | १६०० | ८७१० | ८७१ | १००१ | १३० |
| ४ | ए.ए.गोरे एलएसएस | ९८३० | २४०० | १२२३० | १२२३ | १५१० | २८७ |
| ५ | एम.एन.सुर्यवंशी ड्रेसर | ८६०० | १६०० | १०२०० | १०२० | १२४० | २२० |
| ६ | बी.व्ही.नागरगोजे शिपाई | ७११० | १६०० | ८७१० | ८७१ | १००१ | १३० |
| | | | | | | | २८८५ |

वरिल पशुसंवर्धन दवाखाण्यातील कर्मचा-यांनी घरभाडे भत्ता/अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम रु २८८५/- संबधीता कडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.
वसुल पात्र रक्कम रु २८८५/-

१२-पशुसवर्धन,
पशुवैद्यकिय दवाखाने,
आस्थापना वेतन व भत्ते,
पं.स.कंधार.

**-- शासन क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(क) खालील आक्षेप**

**-- निरंक --**

## भाग दोन : इतर अनियमितता

**-- स्थानिक क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(ड) खालील आक्षेप**

### परि.क्रं.(२१) पशु प्रदर्शना वरील खर्चा बाबत.

प्र.क्रं.१) दि.८/१२/११ रु १००००/- पशु प्रदर्शन बाचोटी (अग्रीम)
प्र.क्रं.२) दि.८/१२/११ रु १००००/- पेठवडज (अग्रीम)
प्र.क्रं. ६५९ ३१/३/१२ रु ३५०००/- पेठवडज (प्रदर्शन दि.९/१२/११ (समायोजन)
प्र.क्रं.६६० दि.३१/३/१२ रु ३४९४५/- बाचोटी (प्रदर्शन दि.२/१२/११)(समायोजन देयक)

| अ.क्रं. | तपशिल | विवरण |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय मान्यता | पशू सवंर्धन व दुग्धशाळा समीती सभा ठराव क्रं. २९८ दि.४/२/२०११ रु ५०००००/- |
| २ | तरतुद वर्ष | अति मु.का.अ.जि.प.नांदेड यांचे पत्र क्रं. पशुसंवि/ता.-३/ १४४० /२०११/दि.१४.१०.११ रु ५०००००/- पं.स.कंधार साठी रु ८००००/- |
| ३ | प्रशासकीय मान्यता | गट विकास अधिकारी प.स.कंधार यांचे आदेश क्रं.पसक्रं /पशूसाठी /क्रं..निरंक दि.२८/११/११ रु ४००००/- |
| ४ | तांत्रिक मंजूरी | गट विकास अधिकारी पं.स.कंधार यांचे आदेश क्रं.पस.क्रं. /प.स.क्रं.निरंक दि.२८/११/११ रु ४००००/- |

सदरील पशु प्रदर्शन योजना जिल्हा परिषद उपकर निधी रु २००००/- पंचायत समिती उपकर निधी रु १००००/- व ग्राम पंचायत लोकवाटा रु ५०००/- एकुण रु ३५०००/- प्रति प्रदर्शन पंचायत समितीस्तरा वर ग्राम बाचोटी व ग्रा.प.पेठवडज येथे पशु प्रदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले पशु प्रदर्शन खर्चावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) पशु प्रदर्शना मध्ये पशु निवड निकष ठरविण्यात आले नाहीत. त्यामुळे कोणत्या निकषाने निवड करण्यात आली याची तपासणी करता आली नाही.

२) प्रदर्शना मध्ये सहभागी जनावरे मालकाची नोद ठेवण्या आली नाही. त्यामुळे किती जनावर मालकाने प्रदर्शना मध्ये सहभाग नोदविला याची तपासणी करता आली नाही. तसेच सहभाग न नोदविता बक्षिसे दिल्यास त्याची तपासणी करता आली नाही.

३) निवड समीतीने शिफारस केलेल्या निवड समितीच्या सहया निधी बक्षिस पात्र जनावर मालकाची यादी संचिकेत उपलब्ध नाही. फक्त बक्षिस वाटप पोच यादी संचिकेत आहे.

४) पशु प्रदर्शना मध्ये सहभाग नोदविलेल्या पशूना चारा पाणी इत्यादीची सुविधा पुरविली नसल्याचे संचिकेत दिसुन येते.

५) अतिरिक्त मु.का.अ.जिल्हा परिषद नांदेड यांचे पत्र क्रं. पशुसंवि/ता.३/१४४०/२०११/दिनांक १४/१०/११ अन्वये कंधार आयोजित करण्यासाठी प्रति प्रदर्शन जि.प.उपकर निधी रु २००००/- प्रमाणे रु ८००००/- निधी पंचायत समिती कंधारला वर्ग करण्यात आला तथापी पंचायत समिती कंधार ने केवळ दोन पशू प्रदर्शनास शिबीर आयोजित केलेली आहेत.त्यामुळे जिल्हा परिषदचा रु ४००००/- चा निधी पंचायत समिती कंधार कडे पडून आहे. तरी सदरील रु ४००००/- चा निधी जिल्हा परिषदला परत करण्यात यावा.

वरील उणीवाची पुर्तता करण्यात यावी तो पर्यत झालेला खर्च रु ६९९४५/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येतो.

अ) जि.प.उपकर रु ३९९४५/-

१२ पशु संवर्धन,<br>
जि.प.उपकर निधी,<br>
पं.स.कंधार.

**-- शासन क्षेत्र --**

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम ९(ड) खालील आक्षेप**

**परि.क्रं. (२२) विशेष घटक योजना अंतर्गत सन १०-११ मधील अखर्चीत निधी बाबत.**

विशेष घटक योजना अतर्गत ५० टक्के लोकवाटा भरुन दुधाळ जनावरे खरेदीतील सन १०-११ मधील अखर्चीत निधी रु १०९७२५/- सन ११-१२ मध्ये खर्च केलेला नाही.

१ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रं. ७८५ दिनांक ३०/६/११ अन्वये दिनांक ३०/३/११ पर्यत खर्च न झाले मुळे सन ११-१२ मध्ये खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली होती. तथापी पशुधन विकास अधिकारी लोहा यांनी सन ११-१२ मध्ये सदरील रक्कम खर्च केलेली नाही. विशेष घटक योजनाचे लाभार्थी, अनुदानापासुन वंचीत राहीलेले आहेत.

२ अखर्चीत रक्कम दि.१८/५/१२ रोजी चलनाने शासन खात्री भरणा केलेली आहे. सदरील रक्कम विलंबाने भरणा केलेली आहे.

वरील बाबींची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे

१२-पशुसवर्धन,
पं.स.लोहा.

**परि.क्र. (२३) वेतन व भत्ते देयकातील अनियमितता बाबत.**

| अ. क्र. | प्र. क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ५७ | ३/२/२०१२ | ४६४३८ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना आदमपूर. |
| २ | ४६ | १२/३/१२ | ४७४७९ | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना आदमपूर. |
| ३ | ५८ | ३/२/१२ | २७९४५ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कोल्हेबोरगाव. |
| ४ | ५९ | ३/२/१२ | ११७१२ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कोल्हेबोरगाव. |
| ५ | ४७ | १२/३/१२ | २३००१ | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कोल्हेबोरगाव. |
| ६ | ५६ | ३/२/१२ | ७०४०६ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कासराळी. |
| ७ | ४४ | १२/३/१२ | ७०४०६ | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कासराळी. |
| ८ | ५४ | ३/२/१२ | ५१०८७ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कुंडलवाडी. |
| ९ | ७८ | १२/३/१२ | ५१०८७ | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना कुंडलवाडी. |
| १० | ५५ | ३/२/१२ | २७५२४ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना बिलोली (व्ही.डी.) |
| ११ | ४५ | १२/३/१२ | २७५२४ | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना बिलोली (व्ही.डी.) |
| १२ | ५३ | १३/२/१२ | १६९११७ | माहे. १/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना बिलोली (प.स.) |
| १३ | ४३ | १२/३/१२ | १६९४०० | माहे. २/१२ वेतन व भत्ते पशुसंवर्धन दवाखाना बिलोली (प.स.) |
| | | एकुण | ७९३१२६ | |

उपरोक्त प्रमाणकान्वये करण्यात आलेल्या वेतन व भत्त्याच्या खर्चावर लेखा परिक्षणात पुढिल प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. उपरोक्त वेतन व देयके तयार करतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ६९ (४) मधील परिशिष्ट ७ प्रमाणे दिलेल्या अनुदेशाची तंतोतंत पालन केल्याचे आढळून आले नाही.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ७७ (२) नुसार प्रदानाची पोच देणे आवश्यक आहे. प्रमाणकानुसार प्रदान करण्यात आलेल्या रकमांची पोच दर्शविलेली नाही.
३. वरील प्रमाणकान्वये प्रदान करण्यात आलेल्या कर्मचा-याचे वेतनाबाबत मुळ सेवापुस्तके उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.
४. लेखापरिक्षणाच्या वेळी पशुसंवर्धन दवाखाण्याच्या पशुसंवर्धन अधिका-यांनी मंजुर पदे, कार्यरत पदे, रिक्त पदांबाबत विवरण पत्र सादर केली नाहीत.
५. वरील प्रमाणकान्वये वेतन देयकातून विविध कपाती करण्यात आलेल्या असून त्याचे भरणा चलन/पोच पावत्या दर्शविण्यात आल्या नाहीत. तरी कपातीच्या भरणा चलन व पोच पावत्या दर्शविण्यात यावेत. कपातीचा तपशिल पुढिल प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पशुसंवर्धन दवाखाना नाव | एल. आय. सी. | सोसायटी | व्यवसाय कर | आयकर | आर. डी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आमदापूर | - | ६३०० | - | - | - |
| २ | आमदापूर | १४७४ | ६३०० | - | - | - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कोल्हेबोरगाव | २८३८ | ४०० | - | - | - |
| ४ | कोल्हेबोरगाव | २८३८ | ४०० | ६०० | - | - |
| ५ | कासराळी | - | ६००० | ६०० | - | - |
| ६ | कासराळी | २८३९ | - | ९०० | ६९२१ | - |
| ७ | कुंडलवाडी | - | - | ६०० | - | - |
| ८ | कुंडलवाडी | २१०२ | ४०० | ९०० | - | - |
| ९ | बिलोली (व्ही.डी.) | - | ३२१० | - | - | ८०० |
| १० | बिलोली (व्ही.डी.) | ४३२९ | ६१४५ | - | - | ८०० |
| ११ | बिलोली (प.स.) | - | ५७९३ | - | - | - |
| १२ | बिलोली (प.स.) | १२६५८ | ५७९३ | - | - | - |
| | एकुण | २९०१८ | ४०७४१ | ३६०० | ६९२१ | १६०० |

वरील अभिप्रायाची पूर्तता करेपर्यत रक्कम रू. ७९३१२६/- लेखापरिक्षणात तात्पुरती अमान्य करण्यात येते.

तात्पुरते अमान्य - रू. ७९३१२६/-

१२ पशुसंवर्धन,
वेतन व भत्ते,
पं.स. बिलोली,
सन २०११-१२.

**परि.क्र. (२४) महाराष्ट्र दर्शन (रजा प्रवास) सवलती बाबत.**

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १०५ | १३/०२/२०१२ | ८१८०/- | सय्यद मकसूद स. अमिर (परिचर) |

पंचायत समिती बिलोली अंतर्गत पशुसंवर्धन दवाखाना कासराळीचे श्री. सय्यद मकसूद स. अमिर यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश क्र. १८८८ दि. २१/१२/२०११ अन्वये कासराळी ते भेंडसी यांनी महाराष्ट्र दर्शन (रजा प्रवास) केला आहे. त्यांनी महाराष्ट्र दर्शन रजा सवलतीसाठी एकुण ४ व्यक्ती व स्वत: असा प्रवास केला आहे. यावर पुढिल प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. शासन निर्णय वित्त विभाग क्र. २ प्रस-१९९४/१९४ सेवा-५ दिनांक २८/३/१९७५ व शासन निर्णय क्र. २ प्रस-१९९६/प्रक्र १४ सेवा-५ दि. ३१/३/१९९९ च्या परि. क्र. २ मधील तरतुदिनुसार प्रवास करतांना जवळच्या मार्गाने म्हणजेच कमी खर्चाच्या मार्गाने प्रवास करणे आवश्यक आहे. त्यामुळे नजीकच्या रेल्वेने प्रवास करणे आवश्यक असतांना तसे न करता सदर प्रवास बसने केला असून बसचे भाडे रेल्वेपेक्षा जास्त आहे.
२. अर्धसमास पत्र क्र. ११ दि. २१/९/२०१२ अन्वये सेवा पुस्तिकेची मागणी करुन सदर कर्मचा-याचे सेवा पुस्तक लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे महाराष्ट्र दर्शनाची नोंद सेवा पुस्तकात घेतली किंवा नाही याची खात्री करता आली नाही.
३. सदर कर्मचा-याची पत्नी शासकिय सेवेत आहे किंवा नाही याबाबत प्रमाणपत्र नाही.

४. सदरील कर्मचा-याने महाराष्ट्र दर्शन १३/१२/२०११ ते १६/१२/२०११ या कालावधीत प्रवास केला असून त्याचा आदेश क्र. १८८८ दि. २१/१२/२०११ रोजीचा आहे. म्हणजेच सदरील कर्मचा-याने महाराष्ट्र दर्शनाचा प्रवास अगोदर केला आहे व नंतर महाराष्ट्र दर्शन (रजा सवलत) मंजूर झालेली आहे. या विसंगती बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

वरील अभिप्रायाची पुर्तता करेपावेतो रक्कम रु ८१८०/- चा खर्च लेखा परिक्षणात तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

तात्पुरते अमान्य : रू. ८१८०/-

पशुसंवर्धन दवाखना कासराळी
पं. स. बिलोली,
सन २०११-१२.

**<u>परि.क्र. (२५) सहावा वेतन आयोग थकबाकीची रक्कम परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर -२ ऐवजी स्तर-१ मध्ये जमा केल्याबाबत.</u>**

पंचायत समिती मुदखेडचे सन २०११-१२ चे लेखा परिक्षणात पशुवैद्यकिय दवाखाना बारडचे प्रमाणकांचे लेखापरिक्षण केले असता प्रमाणक क्र. १८३ दि. ३१/३/२०१२ रक्कम रु. ३४६२/- व प्रमाणक क्र. १८४ दि. ३१/३/२०१२ रक्कम रु. १३०२/- अन्वये अनुक्रमे श्री. श्रीपाद वसंतराव जवळेकर, परिचर व गणेश व्यंकटि माचनवाड, परिचर यांच्या सहाव्या वेतन आयोग थकबाकीची रक्कम देयकासोबत जोडलेल्या फॉर्म-२ नुसार संबंधिताच्या परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-१ मध्ये जमा करण्यात आली आहे.

तथापि, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-१०१०/प्र.क्र.६७/सेवा-४ दिनांक १४ डिसेंबर २०१० नुसार दि. १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर निवृत्त होणा-या कर्मचा-यांची दिनांक १ जानेवारी २००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ पर्यंतची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर २ मध्ये जमा करण्यात यावी.

याबाबतीत स्तर १ व स्तर २ मधील मुख्य फरक असा की स्तर १ मध्ये जमा होणारी रक्कम आहरीत करता न येण्याजोगी असून त्यावर नियोक्त्याचे समतुल्य अंशदान जमा होणार आहे. याउलट स्तर २ मध्ये जमा होणा-या रकमेवर नियोकत्याचे कुठलेही अंशदान जमा न होता त्यामधील रक्कम आहरण करण्यायोग्य असणार आहे.

त्यामुळे उपरोक्त सहाव्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम रु. ४७६४ स्तर २ मध्ये जमा करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तरी उपरोक्त आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपावेतो रक्कम रु. ४७६४/- लेखापरिक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

आक्षेपाधीन रक्कम रु. ४७६४/-

१२ पशुसंवर्धन,
वेतन व भत्ते,
पं. स. मुदखेड.

**<u>परि.क्रं. (२६) ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना खाती जमा करण्यातील अनियमितते बाबत.</u>**

पंचायत समिती हिमातनगरचे सन २०११-१२ चे लेखा परिक्षणात पशुधन विकास अधिकारी हिमायतनगर यांचनी प्रमाणक क्रं.८९ दिनांक २१.२.१२ रक्कम रु ३१६८/- अन्वये श्री.साळवे एम.डी.परिचर यांची ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना खाती जमा केली आहे.

या बाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. अंनियो/१०१०/प्र.क्रं.६७/सेवा-४/दिनांक १४.१२.२०१० नुसार दिनांक १ नोव्हेबर २००५ किवां त्या नंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांनी दिनांक १ जानेवारी २००६ ते दि.३१/३/२००९ पर्यतची ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर २ मध्ये जमा करण्यात यावी.

२) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रं.५ नुसार आहरण व संवितरण अधिका-यानी वेतन देयका सोबत परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेखाती करण्यात आलेल्या वजातीची अनुसुची जोडतांनास्तर १ व स्तर २ खाली जमा होणा-या रक्कमा कर्मचा-यांच्या नावा समोर स्वतंत्र पणे दर्शविणे आवश्यक आहे. अशी अनुसुची जोडण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३) तसेच सदर निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर-१ मध्ये जमा होणारी रक्कम आहरीत करता न येण्या जोगी असुन त्यावर नियोकत्याचे समतुल्य अंशदान जमा होणार आहे. या उलट स्तर-२ मध्ये जमा होणा-या रक्कमेवर नियोकत्याचे कुठलेही अंशदान जमा न होता त्या मधील रक्कम आहरण योग्य असणार आहे. हा दोन्हीस्तरामधील मुळ फरक असल्या कारणाने देयका सोबतच्या वजातीच्या अनुसूचीमध्ये स्तर-१ व स्तर-२ खाली जमा होणा-या रक्कमाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त आक्षेपाची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

१२-पशुसंर्वधन

**परि.क्र. (२७) पशुधन विकास अधिकारी देगलूर यांची आयकर कपातीची रक्कम शासन खाती भरणा न केले बाबत.**

पशुधन विकास अधिकारी देगलूर यांना माहे फेब्रुवारी २०१२ चे वेतना सोबत कपात केलेल्या आयकर रक्कमेचा धनादेश क्रं.४१७४६ दि.३/४/२०१२ रक्कम रु १५५००/- प्रदान केलेला आहे.

तथापी लेखा परिक्षण कालावधी पर्यत सादर रक्कम शासन खाती भरणा करण्यात आलेली नाही. तरी भरणा करण्याची कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे तो पावेतो रक्कम रु १५५००/- तात्पुरती अमान्य करण्यात येते.

तात्पुरता अमान्य : १५५००/-

१२- पशुसर्वधन
पं. स. देगलूर

**परि.क्रं. (२८) पशुवैद्यकिय दवाखाण्याची वसुल केलेली सेवा शुल्काची रक्कम विलंबाने भरणा केले बाबत.**

पंचायत समिती किनवटचे सन २०११-१२ चे लेखा परिक्षणात पशुसवंर्धन विभागाने सेवा शल्काची नोदणी शुल्क,कृत्रिम वेतन शुल्क,दौ-यावरील शुल्क,लसीकरण,गर्भतपासणी फी, वधत्व

तपासणी फी,शस्त्रक्रीया इत्यादी शुल्क जमा केलेली आहे परतु भरणा विलंबाने केला आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ. क्रं. | दिनांक<br>जमेचा कालावधी | दवाखाण्याचे नांव | सेवा शुल्क जमा | सेवा शुल्क भरणा | सेवा शुल्क भरणा दि. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९/१/१२ ते १६/२/१२<br><br>१९/२/१२ ते ३१/३/१२ | पशुवैद्यकिय दवाखाना शिवनी श्रेणी-२<br>-/- | ४३८<br><br>४११ | ४३८<br><br>४११ | १८/२/१२<br><br>२/४/१२ |
| २ | २०/१/१२ ते १७/२/१२<br>२१/२/१२ ते ३१/३/१२ | इस्लापुर<br>-/- | ३३७<br>१५० | ३३७<br>१५० | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ३ | २०/११/१२ ते १६/२/१२<br>२१/२/१२ ते ३०/३/१२ | दहेली तांडा<br>-/- | १४५<br>३०५ | १४५<br>३०५ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ४ | २०/१/१२ ते १६/२/१२<br>२१/२/१२ ते ३१/३/१२ | धनोरा<br>-/- | २०९<br>२३६ | २०९<br>२३६ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ५ | १९/१/१२ ते १६/२/१२<br>१९/२/१२ ते ३१/३/१२ | बोधडी (बु)<br>-/- | ५५४<br>९८३ | ५५४<br>९८३ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ६ | २०/१/१२ ते १७/२/१२<br>१८/२/१२ ते ३१/३/१२ | उमरी (ब)<br>-/- | ३५७<br>२७२ | ३५७<br>२७२ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ७ | १९/१/१२ ते १८/२/१२<br>१९/२/१२ ते ३१/३/१२ | पशुवैद्यकिय दवाखाना<br>अप्पाराव पेठ | १५०<br>२०९ | १५०<br>२०९ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ८ | २०/१/१२ ते १७/२/१२<br>२२/२/१२ ते ३०/३/१२ | मांडवा<br>-/- | १५८०<br>१३०४ | १५८०<br>१३०४ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ९ | २०/१/१२ ते १७/२/१२<br>२१/२/१२ ते ३१/३/१२ | पाटोदा (खु)<br>-/- | १९०<br>२५३ | १९०<br>२५३ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| १० | १९/१/१२ ते १७/२/१२<br>१८/२/१२ ते ३१/३/१२ | घोटी<br>-/- | ३४८<br>३८३ | ३४८<br>३८३ | १८/२/१२<br>२/४/१२ |
| ११ | १९/१/१२ ते १७/२/१२<br>१८/२/१२ ते ३१/३/१२ | मारेगांव (वरचे)<br>-/- | १२५<br>१४१ | १२५<br>१४१ | १८/२/१२<br>२/४/१२ |

यावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१) पशुवैद्यकिय दवाखाण्यात वसुल केलेली सेवा शुल्क व इतर शुल्काची रक्कम त्याच दिवशी भरणा करणे आवश्यक आसतांना वरील तपशिल नुसार रक्कमा प्राप्त व भरणा केलेला आहेत. म्हणजेच विलंबाने रक्कमा भरणा केलेल्या आहेत.

२) पशुवैद्यकिय दवाखाना मलकापुर,पिंपळगांव,कनकी,सदरील दवाखाण्याचे सेवा शुल्काचे लेखे व अभिलेखे लेखा परिक्षणात उपलब्ध केले नाहीत.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

पशुसवंर्धन,
सेवा शुल्क,
पं.स.किनवट.

**परि.क्र. (२९) जमानत नामे घेणेबाबत.**

पशुसंवर्धन विभाग, जि. प. नांदेडच्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात खालील कर्मचा-यांचे जमानत नामे घेणे आवश्यक असतांना जमानत नामे घेतलेले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखसंहिता १९६८ चे नियम ४३ (१) मधील तरतुदीप्रमाणे जमानत नामे घेवून नियम ४३(३) मधील न.न. ६ जमानत नामे नोंदवहित नोंदविणे आवश्यक आहे, परंतू विभागातील कर्मचा-याचे जमानत नामे घेतलेले नसून जमानत नामे नोंदवही देखील ठेवलेली नाही.

१. बी. व्ही. कोकरे - रोखापाल

२. पी. के. सिरसेवाड - भांडारपाल

३. जी. आर. हाडे - आवक-जावक लिपिक.

संबंधित कर्मचा-यांचे जमानत नामे घेवून त्यातील नोंदि जमानत नामे नोंदवहित नोंदवून अनुपालन दर्शवावे.

१२ पशुसंवर्धन विभाग,
जि.प. नांदेड.

**परि.क्र. (३०) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाच्या किरकोळ रोखपुस्तिकेबाबत.**

पशुसंवर्धन विभाग जि. प. नांदेडचे सन २०११-१२ चे लेखा परिक्षणात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाच्या किरकोळ रोख पुस्तिकेची तपासाणी केली असता त्यावर पुढिलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७७(३) प्रमाणे दर महिना अखेर असंवितरीत रकमांचा गोषवारा काढणे आवश्यक आहे व सदरील रकमा तीन महिण्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत अदत्त ठेवता कामा नये. असे असतांना दि. ३१ मार्च २०१२ अखेर रोख पुस्तिकेप्रमाणे एकुण रक्कम रु. ३३७४/- शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. शिल्लक रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| निविदा फी | रु. १५००/- |
| माहिती अधिकार फी | रु. ६४२/- |
| पडाळा यांचे थकित वेतन (अनुपस्थिती असल्याने) | रु. १२३२/- |
| एकुण | रु. ३३७४/- |

सदर रकमा तीन महिण्यापेक्षा जास्त कालावधीच्या असल्याने अदत्त ठेवता येत नाहीत. तरी सदर रक्कमा चलनाद्वारे त्या त्या लेखाशिर्षाखाली जमा करुन अनुपालन दर्शवावे व या पुढे अशा अदत्त रक्कमा राहणार नाहीत, या बाबत दक्षता घ्यावी.

१२ पशुसंवर्धन विभाग,
जि. प. नांदेड.

**परि.क्र. (३१) न.नं. ३३ मालसंग्रह नोंदवही बाबत.**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेडच्या सन २०११-१२ वित्तीय वर्षाच्या लेखा परिक्षणात न.नं. ३३ मालसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९१ प्रमाणे साठा नोंदवही ठेवणारा अधिकारी यानी ६ महिण्यातून एकदा साठा नोंदवहीची शिल्लक पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.
२. साठा नोंदवही न.नं. ३३ मधील पृष्ठ क्र. १२, २३, ३६, ४० व ४४ वर साठा नोंदवही ठेवणा-या अधिका-यांची स्वाक्षरी दिसुन आली नाही.
३. न. नं. ३३ मध्ये पृष्ठ क्र. ७ वर सिप्रोव्हेट बोलस २५००० नग जमा दर्शविले आहेत. सुरवातीची शिल्लक निरंक आहे. वाटप तपासले असता वाटप २५०१० दर्शविले आहे. प्राप्त संख्या २५००० असतांना १० नग जादा वाटप दर्शविले. १० नग जादा वाटपाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
४. न.नं. ३३ ला साहित्या प्राप्त दर्शवून पशुवैद्यकिय दवाखण्यांना वाटप दर्शविले आहे. परंतु वाटपाबाबतचे मागणी अर्ज लेखा परिक्षणात दिसुन आले नाहीत.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे व भविष्यात अशा उणिवा राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

१२ पशुसंवर्धन विभाग

जि.प. नांदेड,
सन २०११-१२.

**परि.क्र. (३२) जडसंग्रह नोंदवहीबाबत.**

पशुसंवर्धन विभाग, जि. प. नांदेडच्या सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात न. नं. ३२ जडसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९८ अन्वये खाते प्रमुखांनी प्रत्येक वर्षी माहे जूनमध्ये जंगम व स्थावर मालमत्ता नोंदवहिची तपासणी करुन तसे प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही, तसेच न.नं. ३२ ला साहित्य प्राप्त दर्शवून पशुवैद्यकिय दवाखाण्यांना वाटप दर्शविले आहे. परंतु वाटपाबाबतचे मागणी अर्ज लेखा परिक्षणात दिसून आले नाहीत. पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

**लेख्यांची स्थिती**

पशुसंवर्धन विभाग जि.प. नांदेड येथील लेख्याची स्थिती सर्वसाधारण असली तरी पुर्णपणे समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही लेख्याची स्थिती सुधारण्यास बराच वाव आहे.

**उत्तरे :-**

या लेखा परिक्षण अहवालातील आक्षेपाचे अनुपालन, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम २०११ चे कलम १०(१) नुसार सदर अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन चार महिण्याच्या आत, जिल्हा परिषदेने मान्य केलेले ठरावाच्या तिन प्रतिसह मा.मुख्य कार्यकरी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या स्वाक्षरीने या कार्यालयास पाठवावे.

लेखा परिक्षण अहवाल मिळाल्याची दिनांकीत पोच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

स्वाक्षरित/-
सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखा परिक्षा,नांदेड

जा.क्र.स्था-३/ब/लेपअह/२०११-१२/ २५६४
दिनांक:- ८-१२-२०१२
प्रत:-

१) मा.प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग मंत्रालय मुंबई ३२
२) मा.सचिव महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलंसधारण विभाग,मंत्रालय मुंबई.
३) मा.सचिव पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग मंत्रालय मुंबई - ३२
४) मा.महालेखाकार लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र विभाग,नागपुर-२
५) मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, संचालनालय महाराष्ट्र राज्य,कोकण भवन ६ वा माळा नवी मुंबई (अहवाल शाखा/पंरास शाखा)
६) मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
७) मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.
८) मा.सहसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा, औंरगाबाद विभाग, औरंगाबाद.
९) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
१०) पुर्नविलोकन शाखा (औरंगाबाद कार्यालय)
११) डी.फाईल.
१२) जादा प्रत

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखा परिक्षा, नांदेड.

३४

**विवरणपत्र क्र. १**

जिल्हा परिषद लेख्यांचा गोषवारा (वर्ष २०११-१२) वित्त विभागाच्या लेखा परिक्षण अहवालासोबत संलग्न केला आहे.

------------- निरंक --------------

**विवरणपत्र क्र. २**

| अ) जिल्हा परिषद नांदेड पशुसंवर्धन विभाग सन २०११-१२ वर्षाचे व्याजासह विवरणपत्र | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शासनसकडून कर्जाचा तपशिल | व्याजासह १-४-२०११ ला थकित बाकिचे हप्ते | शिल्लक कर्जाचे दि. १-४-२०११ पर्यंत परत करावयाचे | वरिल वर्षात मिळालेले/घेतलेले कर्ज | सन २०११-१२ देय कर्जाची रक्कम | सन २०११-१२ मध्ये अदा केलेले | ३१-३-२०१२ ला थकित असलेले | शिल्लक रक्कम कर्ज |
| | | | | भांडवल व्याज | भांडवल व्याज | मुद्दल व्याज | मुद्दल व्याज | मुद्दल व्याज |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| ------------- निरंक -------------- | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| **विवरणपत्र क्र. २** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब) जिल्हा परिषदेने दिलेले कर्ज पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेड, २०११-१२ | | | | | | | | | |
| अ. क्र. | तपशिल | मागणी वर्षाची | सन २०११-१२ मध्ये नविन | वसूल केलेले कर्ज | दि. ३१-३-२०११ ला कर्ज थकबाकिची | १.४.२०११ ला थकित असणारे हप्ते | २०११-१२ मध्ये देय हप्ते | २०११-१२ मध्ये वसूल हप्ते | २०११-१२ मध्ये थकित हप्ते |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | मुद्दल व्याज | मुद्दल व्याज | मुद्दल व्याज | मुद्दल व्याज |
| - | - | - | - | - | निरंक | - | - | - | - |

| विवरणपत्र क्र. २ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क) शासनाकडून घेतलेले कर्ज (२) व्याज विरहित व्यतीरिक्त पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेड, सन २०११-१२ | | | | | | | | | |
| अ. क्र. | तपशिल | पुर्वीची शिल्लक | चालू वर्षात २०११-१२ मध्ये घेतलेले कर्ज | एकूण | आतापर्यत थकबाकिचे २०११-१२ मधील देय थकबाकी | जाम केलेल्या हप्त्यांची संख्या | थकबाकी हप्त्यांचा तपशिल | कर्ज शिल्लक | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| - | - | - | - | - | निरंक | - | - | - | - |

| **विवरणपत्र क्र. ३** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड, शासन अनुदानाचे विवरणपत्र सन २०११-१२ | | | | | |
| अ. क्र. | अनुदान तपशिल | प्राप्त तरतुद | झालेला खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
| १ | आस्थापना अनुदान | ९६८१९००० | ८५६६९३८३ | १११४९६१७ | - |
| २ | सप्रयोजन अनुदान | २२४५००० | १६१०४०८ | ६३४५९२ | - |
| ३ | योजना अनुदान | १३७२३२५० | १०२२४८९८ | ३४९८३५२ | - |
| ४ | अभिकरण योजना | - | ६४१८०४ | - | ६४१८०४ |

| विवरणपत्र क्र. ४ (अ) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अंतीम अमान्य रक्कमांचे विवरण पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड, सन २०११-१२ | | | | | | |
| **अ.क्र.** | **आक्षेपाचा संक्षिप्त तपशिल** | **परि. क्र.** | **आस्थापना** | **सप्रयोजन** | **योजना** | **अभिकरण** |
| १ | शेळी गट वाटपाबाबत. | ५ | - | - | १८३३० | - |
| २ | चुकीची वेतन निश्चितीमुळे झालेले जादा प्रदान | १३ | ८६२०७ | - | - | - |
| ३ | आयकर रक्कम कमी भरणा | १४ | ९७८१ | - | - | - |
| ४ | वेतन व भत्ते देयकाबाबत | १५ | ५९१० | - | - | - |
| ५ | वेतन व भत्ते देयकाबाबत | १६ | ३२६० | - | - | - |
| ६ | निवासस्थान विद्युत देयकाबाबत. | १७ | १४३० | - | - | - |
| ७ | महाराष्ट्र दर्शन सवलत योजनेतील अदायीबाबत. | १८ | ३५८२ | - | - | - |
| ८ | अपंग भत्ता जादा अदायीबाबत. | १९ | १२७५ | - | - | - |
| | **एकुण** | | **१११४४५** | | **१८३३०** | |

| विवरणपत्र क्र. ४ (ब) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **तात्पुरता अमान्य रक्कमांचे विवरण पशूसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड, सन २०११-१२** | | | | | | |
| अ.क्र. | आक्षेपाचा संक्षिप्त तपशिल | परि. क्र. | आस्थापना | सप्रयोजन | योजना | अभिकरण |
| १ | वंधत्व निवारण शिबिरे औषधी खरेदि | ३ | - | - | १४४३४२८ | - |
| २ | निडल व सिरींज खरेदि | ४ | - | ७१३००० | - | - |
| ३ | शेळी गट वाटपाबाबत. | ५ | - | - | ३६०००७ | - |
| ४ | संकरित गायी पुरवठाबाबत | ६ | - | - | ४२९४५० | - |
| ५ | दुधाळ जनावरे वाटपाबाबत. | ७ | - | - | १०९७२५ | - |
| ६ | शेळी गट व दुधाळ जनावरे गट खरेदि. | ८ | - | - | ७९२३९९ | - |
| ७ | खाद्यपुरवठा खर्चाबाबत. | ९ | - | - | ११२८० | - |
| ८ | खाद्यपुरवठा खर्चाबाबत. | १० | - | - | ४५१११ | - |
| ९ | खाद्यपुरवठा खर्चाबाबत. | ११ | - | - | १९७४० | - |
| १० | शितपेट्या खरेदिबाबत. | १२ | - | १९५७५० | - | - |
| ११ | वेतन व भत्ते देयकाबाबत. | १५ | २४९००४ | - | - | - |
| १२ | वेतन व भत्ते देयकाबाबत. | १६ | १६५२७१ | - | - | - |
| १३ | महाराष्ट्र दर्शन सवलत योजनातील अदायीबाबत. | १८ | ३४१६८ | - | - | - |
| १४ | वेतन व भत्ते देयकातील अनियमितता. | २३ | ७९३१२६ | - | - | - |
| १५ | महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीबाबत. | २४ | ८१८० | - | - | - |
| १६ | आयकर कपात रक्कमा भरणा न केलेबाबत. | २७ | १५५०० | - | - | - |
| | | **एकुण** | **१२६५२४९** | **९०८७५०** | **३२११४०** | |